



# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०७ | किंमत : २ रूपये



**Hotel Mai VilLa**
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# ३ महिन्यांच्या बाळासह एकाच कुटुंबातील ६ जणांचा अंत

**वृत्तसंस्था, जळगाव**

जिल्ह्यातील जामनेर-बोदवड मार्गावर गुरुवारी एक अत्यंत भीषण अपघाताची घटना घडली. मालदाभाटी गावाजवळ भरधाव मालवाहू ट्रकने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरुन जाणाऱ्या एकाच कुटुंबातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन महिन्यांच्या चिमुकल्या बाळासह तीन लहान मुले, दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. या दुर्घटनेमुळे जळगाव जिल्ह्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



प्राथमिक मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशमधील बऱ्हाणपूर येथील एक कुटुंब दुचाकीवरून जात होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास जामनेर तालुक्यातील मालदाभाटी शिवारातील मुख्य रस्त्यावर वेगात येणाऱ्या मालवाहू ट्रकने दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भयानक होती की, दुचाकीवरील सर्वजण हवेत उडून रस्त्यावर दूर फेकले गेले. अपघाताचा मोठा आवाज ऐकून शेतकरी आणि आजूबाजूचे ग्रामस्थही तात्काळ मदतीसाठी धावून आले. मात्र, तोपर्यंत सहाही जणांचा जीव गेला होता.

अपघाताचे दृश्य पाहून घटनास्थळी असलेल्या लोकांनाही जबर धक्का बसला. अपघाताची माहिती मिळताच जामनेर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व मृतदेह जामनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहेत. या अपघातानंतर काही वेळ परिसरात तणाव व गोंधळाचे वातावरण होते. पोलिसांनी तातडीने ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. मृतांची नेमकी ओळख पटवून त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचे काम पोलिसांकडून चालू आहे.

**कुटुंबाचा अंत झाल्याने हळहळ**

या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहा जण अवघ्या काही सेकंदांत मृत्यूमुखी पडल्याने नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. लहान मुलांचाही यामध्ये समावेश असल्यामुळे स्थानिकांच्याही डोळ्यात पाणी आले.

**थोडक्यात**

## सोन्याचे भाव पुन्हा कोसळले

**मुंबई :** सोन्याच्या किंमती सातत्याने घसरत आहेत. आज देखील यात २,४२० रुपयांची घसरण नोंदवली गेली आहे. आज गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी देशात २४ कॅरेट सोन्याची किंमत १,४६,०९० रुपये प्रति १० ग्रॅम आहे, तर काल ही किंमत १,४८,५१० रुपये प्रति १० ग्रॅम होती. यावरून सोन्याचा भाव आज पुन्हा घसरल्याचे स्पष्ट होते. आज २२ कॅरेट सोन्याच्या किंमतीतही प्रति १० ग्रॅम २,२१८ रुपयांची घट झाली आहे. आज याची किंमत १,३३,९१६ रुपये प्रति १० ग्रॅम आहे, तर काल ती १,३६,१३४ रुपये प्रति १० ग्रॅम होती. सोन्याचे दर घसरल्याने खरेददारांसाठी मोठी संधी आहे. सिल्वर ९२५ स्टर्लिंगची किंमत १,९२,७१५ रुपये प्रति किलोग्राम नोंदवली गेली आहे. बऱ्याच काळापासून सातत्याने सुरू असलेल्या तेजीनंतर, आज पहिल्यांदाच सिल्वर ९२५ स्टर्लिंगची किंमत २,००,००० रुपयांच्या मनोवैज्ञानिक पातळीच्या खाली आली आहे. चांदीच्या किंमतींमधील हा सुधारात्मक बदल बुधवारच्या जागतिक बाजारातील विक्रीचा आणि देशांतर्गत बाजारातील नफावसुलीचा परिणाम आहे. सोन्याच्या किंमतीत झालेली ही घसरण प्रामुख्याने मजबूत अमेरिकन डॉलरमुळे झाली आहे. अमेरिकन डॉलर इंडेक्स त्याच्या १८ महिन्यांच्या उच्चांकी पातळीवर (सुमारे १०२.५७ ते १०२.७३) पोहोचला आहे. डॉलर मजबूत झाल्यावर, डॉलरमध्येच व्यवहार व भुगतान करावे लागत असल्याने रुपया किंवा युरोसारख्या चलनांचा वापर करणाऱ्या खरेदीदारांसाठी सोने खरेदी करणे महाग आणि कठीण होते.

# सीजेपीचे आज आंदोलन



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दिल्लीमध्ये कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावरून राजकीय वातावरण तापले आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके आणि एआयएसएच्या अध्यक्षा नेहा बोरा यांच्या पत्रकार परिषदेत गोंधळ झाल्याची माहिती समोर आली आहे. या पत्रकार परिषदेला अभिनेते प्रकाश राज यांचीही उपस्थिती होती. दरम्यान, १६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत पुन्हा आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेविरोधात पक्षाकडून निषेध नोंदवला जात आहे. याच मागण्यांसाठी पक्षाने पुन्हा एकदा आंदोलनाची घोषणा केली आहे.

पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी बुधवारी एक व्हीडीओ प्रसिद्ध केला. या व्हीडीओच्या माध्यमातून त्यांनी नागरिकांना १६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत एकत्र येण्याचे आवाहन केले. सायंकाळी ५ वाजता हातात तिरंगा घेऊन कनॉट प्लेस येथे जमण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. मात्र, या आंदोलनाला विरोधही होत आहे. दिल्लीतील एका व्यापारी संघटनेने आंदोलन थांबवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील परिस्थितीकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, नेहा बोरा आणि अभिजीत दिपके यांच्या पत्रकार परिषदेत नेमका कशामुळे गोंधळ झाला, याबाबत अधिक तपशील स्पष्ट होणे आवश्यक आहे. आंदोलनाच्या घोषणेनंतर दिल्ली पोलिसांची भूमिका काय असेल आणि आंदोलनाला परवानगी मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**जंतरमंतरवर आंदोलनाला परवानगी नसल्याचा दावा**

१२ ऑक्टोबर रोजी जंतरमंतरला अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला. त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीने कनॉट प्लेस येथे आंदोलन करण्याची घोषणा केली. याचदरम्यान, पक्षाचे सदस्य सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी अटक केल्याची माहिती देण्यात आली. या अटकेच्या निषेधार्थ दिल्लीत मोर्चा काढण्याची तयारी पक्षाकडून सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर नेहा बोरा आणि अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषद घेतली.

**नेहा बोरा म्हणाल्या, संघर्ष अजूनही सुरू आहे**

पत्रकार परिषदेत बोलताना नेहा बोरा यांनी हा संघर्ष केवळ दिल्लीपुरता मर्यादित नसल्याचे सांगितले. दिल्लीतील जंतरमंतर, बंगळुरूमधील फ्रीडम पार्क आणि मुंबईतील शिवाजी पार्क यांसारख्या ठिकाणीही विविध प्रश्नांवर आंदोलने सुरू असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

**ज्ञानेश कुमार यांच्यासाठी संपूर्ण दिल्ली बंद केली**

अभिजीत दिपके यांनी जंतरमंतरवरील आंदोलनाचा मुद्दा उपस्थित करत सरकारवर टीका केली. जंतरमंतरवर तिरंगा फडकवण्याच्या कृतीला कायद्याचे उल्लंघन मानण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणात निर्बंध लावण्यात आल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मुद्द्यावरून सरकार इतकी कठोर भूमिका का घेत आहे असा सवालही त्यांनी केला.

**१६ ऑक्टोबरच्या आंदोलनाकडे लक्ष**

सौरभ दास आणि आशुतोष रांका यांच्या अटकेच्या निषेधार्थ तसेच एसआयआर प्रक्रियेविरोधात कॉकरोच जनता पार्टीने आंदोलनाची तयारी केली आहे. १६ ऑक्टोबर रोजी कनॉट प्लेस येथे होणाऱ्या या आंदोलनासाठी नागरिकांना तिरंगा घेऊन सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'पुणे शिक्षक'साठी भाजपच्या विरोधात बंडखोराला शिवसेनेचा पाठिंबा?

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीतील मतभेद चव्हाट्यावर आला आहे. अमरावतीमध्ये शिवसेनेच्या उमेदवारासमोर भाजपचा बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात आहे. त्याचे उट्टे आता शिवसेना पुण्यात काढण्याची शक्यता आहे. पुणे शिक्षक मतदारसंघामध्ये शिवसेनेने बंडखोर उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा जाहीर केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच ही माहिती दिली. काही ठिकाणी अपवाद आहेत, असं सांगत एकनाथ शिंदे यांनी सचिन सानपांना पाठिंबा दिला आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघामध्ये महायुतीकडून भाजपचे कौस्तुभ गावडे हे रिंगणात आहेत. त्या आधी एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांनी माघार घेतली होती. असं असलं तरी अमरावतीमध्ये मात्र शिवसेनेच्या उमेदवारासमोर भाजपच्या बंडखोरांचं आव्हान आहे. त्याचे पडसाद आता पुण्यात पडत असून शिंदेंच्या शिवसेनेने बंडखोर सचिन सानप यांना पाठिंबा दिला आहे.

महत्वाचं म्हणजे, दोनच दिवसांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुका या महायुती म्हणून एकत्रित लढवणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यानंतर आता एकनाथ शिंदे यांनी पुण्यामध्ये बंडखोर उमेदवाराला शिवसेनेचा पाठिंबा जाहीर केला आहे. माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, आम्ही महायुती म्हणून एकत्रित ही निवडणूक लढवत आहोत. पण पुणे शिक्षक मतदारसंघासाठी आमचा पाठिंबा सचिन सानप यांना आहे. महायुती म्हणून लढत असलो तरी काही ठिकाणी अपवाद आहेत, काही ठिकाणी मैत्रिपूर्ण लढत होईल. पण पाचही जागा या महायुतीच्या निवडून येतील.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या या भूमिकेमुळे इतर ठिकाणीही त्याचे पडसाद उमटू शकतात अशी शक्यता वर्तवली जात आहे. सचिन सानप यांनी या आधी शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांचे ओएसडी म्हणून काम केलं आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या निमित्तानं महायुतीतला सुप्त संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपनं कौस्तुभ गावडेंना उमेदवारी दिली आहे. यानंतर शिवसेनेच्या मंगेश चिवटेंनीही आधी दाखल केलेला अर्ज मागे घेतला. मात्र पुण्याची जागा हुकल्यानं शिवसेनेमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे.

मात्र, अमरावतीत शिवसेनेच्या अधिकृत उमेदवाराविरोधात भाजपचा बंडखोर निवडणूक लढवत असल्याने शिवसेनेनं अमरावतीचे उट्टे पुण्यात काढायचं ठरवलंय. पुणे शिक्षक मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवणाऱ्या सचिन सानप यांना पाठिंबा देण्याचा विचार शिवसेनेकडून केला जातोय.

# मदत तुटपुंजी, शेतकरी संतप्त

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यात भीषण दुष्काळ पडला असून, मराठवाडा, विदभार्तील स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शेतकऱ्यांचा खरीप हंगाम तर वाया गेला. त्यानंतर रबी हंगामदेखील हातातून गेला आहे. या अभूतपूर्व संकटात राज्य सरकारने भरघोस मदत जाहीर करणे आवश्यक होते. परंतु आधी नियमावलीचे कारण सांगून दिवाळीआधी शेतकऱ्यांना मोठी मदत देण्याचे आश्वासन दिले. मात्र, आता पंचनाम्याचे कारण पुढे करून केंद्राच्या मदतीला विलंब होणार असल्याचे सांगत दिवाळीआधी शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजारांवर बोळवण करण्याचा निर्णय घेतला. भीषण दुष्काळ आणि महागाईचा उच्चांक पाहिला तर ही अत्यंत तुटपुंजी रक्कम असून ही शेतकऱ्यांची



थट्टा आणि फसवणूक आहे. शेतकरी काय भिकारी आहे का, अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकरीदेखील तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

राज्य सरकारने पीक पंचनाम्याचे आदेश देताना दिवाळीआधी शेतकऱ्यांना मोठी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मोठ्या मदतीची अपेक्षा होती. परंतु आधी ५ ऑक्टोबरच्या डेडलाईनची नियमावली सांगितली. परंतु शेत शिवारात सध्या सर्वत्र धुरळा असताना सरकारने पंचनाम्याचे कारण दिले आणि आता पंचनाम्याला विलंब लागतोय, त्यामुळे दिवाळीआधी मोठी मदत देता येणार नाही, म्हणून अग्रिम रकमेच्या नावाखाली शेतकऱ्यांची दिवाळीआधी केवळ ५ हजारांत बोळवण करण्याचा काल निर्णय जाहीर केला. त्यामुळे विरोधी पक्षनेत्यांसह शेतकरी नेते, शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. सरकारच्या या घोषणेचा निषेधही केला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारबद्दल संतापाची भावना निर्माण झाली असून, राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला, अशा शब्दांत फडणवीस सरकारवर टीकास्त्र होत आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ६ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेजनुसार दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याची घोषणा केली. या निर्णयावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ५ हजार रुपयांची मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याचे म्हटले. ही मदत तुटपुंजी असून शेतकऱ्यांच्या भावनेशी खेळ असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

**सरकारचे धोरण शेतकरीविरोधी**

दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची मदत देऊन शेतक-यांची दिशाभूल केली जात आहे. आंदोलन आणि मोर्चांपासून शेतकऱ्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी सरकार हा डाव खेळत आहे. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, त्यांना तुटपुंजी मदत नव्हे तर हेक्टरी १ लाख रुपयांचे अनुदान मिळणे आवश्यक आहे. सरकारचे धोरण शेतकरी हिताचे नाही, सरकारच्या ५ हजारांसाठी शेतकऱ्यांना बँकेच्या दारात उभे राहावे लागणार आहे. ही शेतकऱ्यांची थट्टा आहे, अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी टीकास्त्र सोडले.

**भरघोस मदतीऐवजी राज्य सरकारकडून लंगडे समर्थन**

महाराष्ट्रात भीषण दुष्काळाची स्थिती १९७२ पेक्षा भयान आहे. शेतकऱ्यांच्या हातात ना खरीप लागला, ना रबीचा हंगाम. त्यामुळे शेतकरी अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडला आहे. अशावेळी नियम बाजूला ठेवून तातडीने मदतीचा हात दिला पाहिजे. परंतु सरकार भीषण परिस्थितीतही हात आकडता घेऊन उलट उपकाराची भाषा करीत आहे. देशात प्रचंड महागाई वाढली आहे. आता खचार्ची हातमिळवणी कशी करायची, याची शेतकऱ्यांना चिंता आहे. अशावेळी कर्नाटकपेक्षा आम्ही अधिक मदत देत असल्याचे सांगून ५ हजारांच्या मदतीचे लंगडे समर्थन केले जात आहे. यावरून शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**शेतकऱ्यांना तोकडी मदत, मग हजारो कोटींचा महामार्ग कसा?**

दुष्काळाने ग्रस्त शेतक-यांना तुटपुंजी मदत दिली आहे. मग हजारो कोटींच्या महामार्ग प्रकल्पावर सरकार पैसे कुठून आणत आहे, असा संतप्त सवाल राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी केला. नाशिक कुंभमेळ्यासाठी ३६ हजार कोटी दिले. शक्तीपीठासाठी ३२ हजार ६०० कोटी आणि भूसंपादनासाठी २० हजार कोटी खर्च करण्याची सरकारची तयारी आहे. मग शेतकऱ्यांना अग्रिमच्या नावाखाली केवळ ६ हजार कोटी कसे, असेही जयंत पाटील म्हणाले.

## तिरंगा फडकावणाऱ्या तरुणांना तुरुंगात डांबणे हा भ्याडपणा

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या(सीजेपी) आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. शांततापूर्ण मार्गाने तिरंगा फडकावणाऱ्या तरुणांना



तुरुंगात टाकणे हे भ्याडपणाचे कृत्य असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर भूमिका स्पष्ट करताना म्हटले जंतर मंतरवर शांततेत तिरंगा फडकावणे हा गुन्हा नाही. यासाठी तरुणांना तुरुंगात पाठवणे हा भ्याडपणा आहे. विद्यार्थी, तरुण, पत्रकार आणि इंडिया आघाडी झेंडे वेगळे असले तरी उद्देश एकच आहे. संविधानाने दिलेले अधिकार मागणाऱ्या नागरिकांचे हे एकच आंदोलन आहे. जंतर मंतर भारताच्या जनतेचे आहे आणि आम्ही त्यावर पुन्हा हक्क मिळवू. काँग्रेसने आतापर्यंत सीजेपीपासून सुरक्षित अंतर राखले होते; मात्र राहुल यांच्या या भूमिकेने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, सौरव दास, आशुतोष रांका आणि अजिंक्य शिंदे यांनी आंदोलन स्थळ म्हणून रद्द केलेल्या जंतर मंतर परिसरात परवानगीशिवाय प्रवेश केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत घोषणाबाजी केल्याने ही कारवाई करण्यात आली. दास आणि रांका यांना तिहार तुरुंगात पाठवण्यात आले, तर शिंदे यांची जामिनावर सुटका झाली.

संपादकीय लेखणीतून...

## खरेदीला लगाम!

यंदा पावसाने दगा दिल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतीवर सर्व अर्थव्यवस्था अवलंबून असल्याने शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्याचा थेट परिणाम शहर व ग्रामीण भागात बाजारपेठेवर जाणवत आहे. वाढती महागाई आणि घटलेली क्रयशक्ती यामुळे ग्राहकांनी दैनंदिन गरजांव्यतिरिक्त इतर वस्तूंच्या खरेदीला मोठ्या प्रमाणात लगाम घातल्याचे चित्र आहे. बाजारपेठेतील व्यवहारांना अनेक चढ-उतारांचा सामना करावा लागत आहे. ऑनलाईन खरेदीचे वाढलेले प्रमाण, ग्राहकांची बदलती जीवनशैली, वाढता वाहतूक खर्च आणि महागाई यामुळे पारंपरिक बाजारपेठेतील व्यावसायिकांपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण अर्थव्यवस्थेची घडी विस्कटल्याने त्याचा परिणाम शहरी भागातील बाजारपेठेतील व्यापारावर होताना दिसत आहे. शेतकरी आणि शेतमजुरांकडून होणारी खरेदी मंदावली आहे. अत्यावश्यक वस्तू वगळता इतर खरेदीवर काटकसर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. स्थानिक बाजारपेठा टिकल्या तरच शहरातील आणि गावातील अनेक छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना आधार मिळणार आहे. खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. शेतीतून काहीच मिळणार नसल्याने कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फर्निचर, बांधकाम साहित्य, हॉटेल व्यवसाय तसेच इतर अनेक वस्तूंच्या खरेदीवर मयार्दा आल्या आहेत. सध्या सर्वसामान्य नागरिकांकडून प्रामुख्याने अन्नधान्य, भाजीपाला, औषधी आणि इतर अत्यावश्यक वस्तूंचीच खरेदी केली जात आहे. सणासुदीच्या काळातही पूर्वीप्रमाणे उत्साहाने खरेदी करण्याऐवजी अनेक ग्राहक खचार्चा विचार करून आवश्यक तेवढीच खरेदी करण्यावर भर देत आहेत. महागाईमुळे घरगुती बजेट कोलमडल्याने अनावश्यक खर्च टाळण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. वाढती महागाई आणि कमकुवत होत असलेल्या स्थानिक चलनामुळे रिझर्व्ह बँकेलाही धोरणात्मक बदल करावे लागले आहेत. बँकेने प्रमुख व्याजदर ५.५० टक्क्यांवर नेला. सुमारे चार वर्षांतील ही पहिलीच दरवाढ असल्याने भविष्यात आणखी दरवाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. अन्न आणि इंधन घटकांमधील वाढीव महागाईमुळे बँकेला ही दरवाढ करावी लागली असे सांगितले जाते.

इराण-अमेरिका युद्धासारख्या भू-राजकीय तणावामुळे तेलाच्या किमती वाढल्या, त्यामुळे भारतासह प्रमुख देशांना व्याजदर वाढवावे लागले. एल निनोमुळे अपुरा पाऊस आणि खाद्यपदार्थांच्या वाढलेल्या किमती यामुळे महागाईचा बडगा उगारला गेला. देशात जुलै महिन्यापासून महागाईचा स्तर सतत वाढत चालला आहे. २०२६ या वर्षाच्या सुरुवातीला देशातील एकूण २२ वस्तू महागाईच्या दबावाखाली होत्या. त्यानंतर महागाईचा प्रभाव इतका वाढला की, ऑगस्टमध्ये एकूण ५१ वस्तू महागाईच्या कचाट्यात सापडल्या. भारतीय स्टेट बँकेने रिसर्च अहवालात म्हटले आहे की, रुपयाची कमजोरी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी मुख्य धोका आहे. कच्चे तेल कंपन्यांकडून वाढती डॉलरची मागणी तसेच इतर कंपन्यांकडून असणारी मागणी रुपयाला कमजोर करत आहे. दिवसेंदिवस डॉलर मजबूत होत चालला आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला पुन्हा एकदा महागाईची तीव्र झळ बसू लागली आहे. केंद्र सरकारकडून घेतल्या जाणा-या आढाव्यानुसार ४२ पैकी ४१ जीवनावश्यक वस्तूंच्या किरकोळ किमतीमध्ये गेल्या वर्षभरात मोठी वाढ झाली आहे.

या यादीत बटाटा हा एकमेव अपवाद ठरला असून त्याचे दर काही प्रमाणात घसरले आहेत. खाद्यपदार्थांच्या वाढत्या किमतीमुळे किरकोळ महागाईचा दर सप्टेंबर महिन्यात ५.५ टक्क्यांवर पोहोचला, जो गत दोन वर्षांतील उच्चांक मानला जात आहे. अधिकृत आकडेवारीनुसार अन्नधान्य महागाईचा दर वार्षिक पातळीवर ७.७४ टक्क्यांवर गेला. यात कांद्याच्या दराने सर्वाधिक उसळी घेतली. कांद्याचे भाव ११३ टक्क्यांनी वाढले तर साखर २२ टक्के आणि सूर्यफूल १८ टक्क्यांनी महागले. तूर, हरभरा डाळीही भाव खाऊ लागल्या आहेत. खाद्यतेलांचेही भाव भडकले. सूर्यफुलाचे दर गतवर्षीपेक्षा १८ टक्क्यांनी, पाम तेल १५.२ टक्क्यांनी, सोयाबीन तेलाचे दर १४.६ टक्क्यांनी वाढले. मोहरी तेल १८८ रुपयांवरून २०४ रुपये प्रति लिटरवर पोहोचले. तांदळाचे दर सरासरी १२ टक्क्यांनी तर साखरेचे दर २२ टक्क्यांनी वाढले. दुष्काळामुळे नवे खरीप पीक बाजारात येण्याची आशा मावळली आहे.

# स्वतःचा झेंडा 'राष्ट्रध्वज' करण्याची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

भारताचा अधिकृत राष्ट्रध्वज असलेल्या तिरंग्याला हटवून त्या जागी स्वतः तयार केलेल्या एका खाजगी ध्वजाला 'राष्ट्रीय ध्वजाचा' दर्जा देण्यात यावा, अशी एक अत्यंत अजब आणि चक्रावून टाकणारी मागणी नुकतीच देशाच्या सर्वोच्च न्यायालयात एका याचिकेद्वारे करण्यात आली होती. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी या विचित्र प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. लोकशाहीत प्रत्येकाला अभिव्यक्तीचे आणि स्वतःचे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य असले, तरी वैयक्तिक कल्पना आणि खाजगी प्रतीकांना थेट राष्ट्रावर थोपवण्याचा हा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कठोर शब्दांत हाणून पाडला. "तुमचा झेंडा तुम्ही तुमच्या घरावर लावा," अशा स्पष्ट आणि खड्या शब्दांत न्यायालयाने याचिकाकर्त्याला वास्तवाचे भान करून दिले आणि ही अतार्किक याचिका तात्काळ फेटाळून लावली.

या प्रकरणात याचिकाकर्त्याने कोणत्याही वकिलाची मदत न घेता स्वतःची बाजू स्वतःच मांडली होती. त्याने स्वतः एक नवीन ध्वज तयार केला होता आणि त्याला 'सत्याचा झेंडा' असे नाव दिले होते. न्यायालयात युक्तिवाद करताना त्याने हा ध्वज सत्य, निसर्ग आणि न्यायाच्या संकल्पनेवर आधारित असल्याचा दावा केला. सध्या देशासमोर अनेक संकटे उभी असून, या परिस्थितीत न्याय मिळवण्यासाठी हा ध्वज एक सर्वांत मोठे शस्त्र आणि प्रतीक ठरू शकतो, असे त्याचे म्हणणे होते. आपल्या या अजब मागणीला वजन प्राप्त करून देण्यासाठी त्याने सनातन धर्म आणि मंदिरांशी संबंधित काही संदर्भही न्यायालयासमोर मांडले. इतकेच नव्हे, तर आपण हा झेंडा आधीच एका मंदिरावर लावला असून, आता त्याला भारताचा अधिकृत राष्ट्रध्वज म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी, अशी त्याची प्रमुख मागणी होती.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अपरेश कुमार सिंह यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्याचा हा तर्कहीन युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने त्याला थेट वास्तवाची जाणीव करून देणारे काही प्रश्न विचारले. "तुम्हाला भारताच्या विद्यमान राष्ट्रध्वजाची रचना काय आहे आणि त्यातील प्रत्येक रंगाचा नेमका अर्थ काय आहे, हे समजावून सांगता येईल का?" असा थेट सवाल न्यायालयाने केला. भारताचा राष्ट्रध्वज आणि देशाची ओळख कायद्याने आणि संविधानाने आधीच निश्चित केलेली आहे, हे न्यायालयाने त्याला ठणकावून सांगितले.

कोणत्याही वैयक्तिक संकल्पनेवर आधारित ध्वजाला राष्ट्रीय ध्वजाचा दर्जा कसा काय देता येईल, असा प्रतिसवाल उपस्थित करत खंडपीठाने या याचिकेतील फोलपणा उघड केला आणि सुनावणीत अधिक वेळ न घालवता याचिका फेटाळली.

या संपूर्ण घटनेतून आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून एक अत्यंत स्पष्ट आणि महत्त्वाचा कायदेशीर संदेश मिळतो. भारताचा तिरंगा हा केवळ एक ध्वज नसून, तो कोट्यवधी भारतीयांच्या एकतेचे, अखंडतेचे आणि ऐतिहासिक बलिदानाचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

त्याचे रंग, आकार आणि वापराबाबत 'भारतीय ध्वजसंहिता' अंतर्गत निश्चित नियम लागू आहेत. भारताच्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या श्रद्धा आणि विचार बाळगण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे; परंतु हे स्वातंत्र्य राष्ट्रीय अस्मितेची जागा घेऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या वैयक्तिक विचारांसाठी किंवा न्यायाच्या मागणीसाठी एखादे प्रतीक किंवा ध्वज तयार केला, तरी त्याला आपोआप 'राष्ट्रीय' मान्यता मिळू शकत नाही.

स्वतःच्या आत्मकेंद्री कल्पनांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवण्याचा हा अट्टहास म्हणजे संविधानाची आणि राष्ट्रीय प्रतीकांची चेष्टा करण्यासारखे आहे. राष्ट्रीय प्रतीके ही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा विशिष्ट विचारधारेची खाजगी मालमत्ता नसतात. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय देऊन वैयक्तिक श्रद्धा आणि राष्ट्रीय अस्मिता यांमधील सीमारेषा अत्यंत स्पष्ट केली आहे.

- ९५६१५९४३०६

# वेस्ट इंडिजने टिम इंडियाला गुडघ्यावर आणले

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

चौथ्या टी२० सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा २४ धावांनी पराभव केला. पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत आणून याच सामन्यानंतर मालिका खिशात घालण्याचे भारताचे मनसुबे धुळीस मिळवत अक्षरशः गुडघ्यावर आणले. आता अंतिम व निर्णायक सामना १७ ऑक्टोबर रोजी बंगळूरु येथे खेळला जाईल.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करावी लाल्यानंतर, वेस्ट इंडिजने २० षटकांत ३ गडी गमावून २४७ धावा केल्या. कर्णधार शाई होपने ५० चेंडूंमध्ये नाबाद १०२ धावा केल्या, जे या मालिकेतील त्याचे दुसरे शतक आहे. यापूर्वी त्याने रांची येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात शतक झळकावले होते. प्रत्युत्तरात, भारताचा संघ १९.३ षटकांत २२३ धावांवर सर्वबाद झाला. संजू सॅमसनने २३ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि चार षटकारांसह ५६ धावा केल्या. तिलक वमार्ने ४३, तर नितीश रेड्डीने ४१ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून कीमो पॉलने पाच बळी घेतले.

हैदराबाद येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यादरम्यान, भारताने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २,००० षटकारांचा टप्पा गाठला. शाई होपने ख्रिस गेलचा विक्रम मोडत, वेस्ट इंडिजसाठी टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक शतके करणारा फलंदाज बनण्याचा मान मिळवला.

**भारत-वेस्ट इंडिज चौथ्या टी२० सामन्यातील प्रमुख विक्रम आणि क्षण...**

**टीम इंडियाच्या पुढे फक्त वेस्ट इंडिज**

भारताने २,००० षटकारांचा टप्पा गाठला आहे. हा टप्पा गाठणारा तो जगातील दुसरा संघ ठरला आहे. संघाच्या नावावर आता २,०१० षटकार आहेत. वेस्ट इंडिज २,०२६ षटकारांसह पहिल्या स्थानावर आहे.

**होपने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये तिसरे शतक झळकावले**

होप वेस्ट इंडिजसाठी टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक शतके करणारा फलंदाज बनला आहे. त्याने ख्रिस गेल आणि एव्हिन लुईस यांच्या प्रत्येकी दोन शतकांचा टप्पा ओलांडला.

**सर्वाधिक ५०-अधिक धावसंख्येच्या बाबतीत होपने गेलची बरोबरी केली**

होपने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आपली १६वी ५०-अधिक धावसंख्या नोंदवली. त्याने वेस्ट इंडिजसाठी सर्वाधिक पन्नास किंवा त्याहून अधिक धावा करण्याच्या बाबतीत ख्रिस गेलची बरोबरी केली. दोघांनीही प्रत्येकी १६ वेळा हा पराक्रम केला आहे.

**भारताविरुद्ध वेस्ट इंडिजची पॉवरप्लेमधील सर्वोच्च धावसंख्या**

हैदराबादमध्ये वेस्ट इंडिजने पॉवरप्लेमध्ये १ गडी गमावून ७९ धावा केल्या. भारताविरुद्ध वेस्ट इंडिजची ही पॉवरप्लेमधील सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वीची धावसंख्या २०१६ मध्ये लॉडरहिल येथे एकही गडी न गमावता केलेली ७८ धावांची होती.

**पॉल, टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्ध ५ बळी घेणारा दुसरा गोलंदाज**

कीमो पॉलने हैदराबादमध्ये ४१ धावांत ५ बळी घेतले. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्ध ५ बळी घेणारा तो दुसरा गोलंदाज आहे. यापूर्वीचा विक्रम २०२२ मध्ये वेस्ट इंडिजच्या ओबेड मॅकॉयने केला होता.

**या सामन्यातील काही लक्षवेधक क्षण, मयंकने रदरफोर्डचा झेल सोडला**

१९ व्या षटकात शेर्फेन रदरफोर्डचा झेल सोडण्यात आला. प्रिन्स यादवने षटकाच्या पाचव्या चेंडूवर एक वेगवान आणि आखूड चेंडू टाकला. रदरफोर्डने पुढे येऊन फटका खेळण्याचा प्रयत्न केला. चेंडू शॉर्ट फाइन लेगच्या दिशेने गेला, जिथे मयंक यादव उभा होता. त्याला वाटले की तो एक सोपा झेल घेईल, पण तो चेंडूच्या रेषेत येऊ शकला नाही आणि त्याने झेल सोडला. मयंक चेंडूच्या रेषेत येऊ शकला नाही आणि रदरफोर्डने झेल सोडला.

**तिलकने झेल सोडल्यानंतर होपचे शतक पूर्ण झाले**

पहिल्या डावाच्या शेवटच्या चेंडूवर तिलक वर्माने होपचा झेल सोडला. ९६ धावांवर असलेल्या होपने नितीश रेड्डीच्या गोलंदाजीवर लाँग-ऑनच्या दिशेने फटका मारला. टिळक चेंडू पकडण्यासाठी डावीकडे गेला, पण फ्लडलाइट्समध्ये त्याला चेंडू नीट दिसला नाही आणि झेल सुटला. चेंडू थेट सीमारेषेच्या बाहेर गेला, ज्यामुळे होपला षटकार मिळाला. त्याने शेवटच्या दोन चेंडूंवर षटकार मारून आपले शतक पूर्ण केले.

**सॅमसनने जोसेफच्या गोलंदाजीवर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १०० षटकार पूर्ण केले**

दुसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर, संजू सॅमसनने शमर जोसेफच्या फुल-टॉस चेंडूवर लाँग-ऑफच्या दिशेने षटकार ठोकला. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील हा त्याचा १०० वा षटकार होता.

टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये षटकारांचे शतक पूर्ण करणारा तो सहावा भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, अभिषेक शर्मा, हार्दिक पांड्या आणि विराट कोहली यांनी हा पराक्रम केला आहे. सॅमसनने ७६ टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १०२ षटकार मारले आहेत.

**बाउन्सरनंतर पुढील १४ चेंडूंमध्ये सॅमसनने ४६ धावा केल्या**

भारतीय डावाच्या दुसऱ्या षटकात, शमर जोसेफने सॅमसनला ताशी १४५ किमी वेगाने एक वेगवान बाउन्सर टाकला. तो फ्री हिट होता. सॅमसनने कसाबसा चेंडू खेळला. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून ४ धावा झाल्या. सॅमसन ९ चेंडूंमध्ये १० धावांवर फलंदाजी करत होता. त्यानंतर त्याने सलग चौकार मारले. पुढच्या १४ चेंडूंमध्ये त्याने ४ षटकार आणि ४ चौकार मारून ४६ धावा पूर्ण केल्या. अर्धशतक पूर्ण केल्यावर सॅमसन आनंद साजरा करताना.

**वेस्ट इंडिजच्या खेळाडूंचा अभिषेक सॅमसनसोबत वाद**

कीमो पॉलने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर विकेट घेतली. त्याने संजू सॅमसनला शिमरॉन हेटमायरकरवी झेलबाद केले. संजू पॅव्हेलियनमध्ये परतत असताना, त्याचा वेस्ट इंडिजच्या खेळाडूंशी वाद झाला. १२ व्या षटकात अभिषेक शर्मा बाद झाल्यावर असाच वाद झाला. पॅव्हेलियनमध्ये परतत असताना अभिषेकनेही पंचांकडे तक्रार केली. बाद झाल्यानंतर परतत असताना, सॅमसन आणि अभिषेक यांचा वेस्ट इंडिजच्या खेळाडूंशी वाद झाला.

**नमन बाद झाल्यावर हेटमायर लहान मुलासारखा उड्या मारू लागला**

१२ व्या षटकात, गुडकेश मोतीने नमन धीरला यष्टीचीत केले. मोतीचा चेंडू जमिनीवर आदळल्यानंतर जोरात उसळला आणि नमनचा फटका चुकला. त्याचा मागचा पाय क्रीझच्या बाहेर गेला. शाई होपने लगेचच यष्टी उडवल्या. तिसऱ्या पंचांनी रिप्ले पाहिल्यानंतर नमनला बाद घोषित केले. विकेट पडल्यावर शिमरॉन हेटमायर लहान मुलासारखा उड्या मारताना दिसला.

- ९०९६३७२०८२

# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक-एक-कण, सोबतच पाणी व निसर्ग वाचविण्याची गरज!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील "उपासमारी" संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला "खाद्य व कृषि संघटन" ( एफएओ ) ची स्थापणा केली."कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश"(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून "विश्व खाद्य दिवस"साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात "आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस" साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करणे.

उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करणे. उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आनणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल."अन्न हे पुर्ण ब्रम्ह" म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते व निसर्गाचे संतुलन टिकवण्यासाठी वृक्षांची गरज असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर व निसर्गावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे.कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.

१६ आक्टोंबर संपूर्ण जग "विश्व खाद्य दिवस"म्हणुन साजरा करतात.कारण खाद्दांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मिळवीण्यासाठी का धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो "वितभर पोटाची खळगी भरणे" कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे यालाही नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता. त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती.

या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले. अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले. जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातून घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या "पोटाची खळगी" भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना "अन्नदाता" म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते.परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी "शतशत प्रणाम" करतो. कारण ऊन, पाऊस, थंडी, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.

भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच "कृषिप्रधान देश"परंतु गेल्या ७९ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते.कारण आजच्या परिस्थितीत देशातील अनेक शेतकरी कोरड्या दुष्काळाशी सामना करीत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते. आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु "आर्थिकदृष्ट्या कंगाल" व शुन्य आहे. कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात. आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी "भोपळा" आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७९ वर्षांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता भासू दिली नाही. परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते. म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप, कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता व एकनिष्ठता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊनच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.

आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का? याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दिसते देशातील ७० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# संविधान वाचविण्यासाठी काँग्रेसला बळ द्या : सिरिवेल्ला प्रसाद

## नागपुरातून संघावर हल्लाबोल, सामाजिक न्यायाच्या भूमीतून संविधानाचा लढा तीव्र करण्याचे आवाहन, अभिजित वंजारी यांच्या प्रचारार्थ कार्यकर्ता मेळाव्यात काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या भूमीतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि न्याय दिला आहे. मात्र, आज संविधान आणि लोकशाहीसमोर आव्हाने उभी केली जात आहेत. स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोणतेही योगदान नव्हते. त्यामुळे संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या रक्षणासाठी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांना पराभूत करा, असा हल्लाबोल काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी सिरिवेल्ला प्रसाद यांनी केला.



नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातील काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजित गोविंदराव वंजारी यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

अभिजित वंजारी यांच्या प्रचारार्थ गुरुवारी दत्तात्रय नगर येथील महाकालकर सभागृहात आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात सिरिवेल्ला प्रसाद बोलत होते. या वेळी माजी मंत्री सुनील केदार, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे, आमदार संजय मेश्राम, उमेदवार अभिजित वंजारी, नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे, मनपातील विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर, नागपूर जिल्हाध्यक्ष ग्रामीण आश्विन बैस, प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसचे महासचिव गिरीश पांडव, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश भोयर, नाना गावंडे, ज्येष्ठ नेते गेव्ह आवारी, अशोक धवड, कुंदा राऊत, किशोर कन्हेरे, याज्ञवल्क्य जिचकार, अँड. आसिफ कुरेशी, अवंतिका लेकुरवाळे, योगिता इटनकर आदी मंचावर उपस्थित होते.

सिरिवेल्ला प्रसाद पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हा देशाचा आत्मा असून त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. संविधानामुळे वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळाला. मात्र, संविधानाने दिलेले अधिकार आणि लोकशाही मूल्ये कमकुवत करण्याचे प्रयत्न होत असतील, तर त्याविरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांनी ठामपणे उभे राहिले पाहिजे. सामाजिक न्यायाची परंपरा असलेल्या नागपूरच्या भूमीतून संविधानाच्या संरक्षणाचा लढा अधिक तीव्र करण्याची गरज आहे. पदवीधर मतदारसंघ हा सुशिक्षित वर्गाच्या प्रश्नांना न्याय देणारा महत्त्वाचा मंच आहे. या निवडणुकीत अभिजित वंजारी यांना विजयी करून संविधानवादी विचारांना बळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

**संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी सज्ज व्हा : नाना पटोले**

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आपल्या भाषणातून संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. देशातील लोकशाही व्यवस्था आणि संविधानाने दिलेले अधिकार टिकवून ठेवण्यासाठी काँग्रेसची भूमिका महत्त्वाची आहे. पदवीधर मतदारसंघातील निवडणूक ही केवळ एका उमेदवाराची निवड नसून सुशिक्षित मतदारांचे प्रश्न आणि त्यांचे प्रतिनिधित्व यांच्याशी संबंधित आहे. त्यामुळे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यानें मतदारांपर्यंत पोहोचून अभिजित वंजारी यांच्या विजयासाठी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले.

**वंजारी यांच्या विजयासाठी एकजुटीने काम करा : सुनील केदार**

माजी मंत्री सुनील केदार यांनी पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीत महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली. पदवीधरांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचा आवाज विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी अभिजित वंजारी यांच्यासारखा अनुभवी लोकप्रतिनिधी आवश्यक आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपापल्या भागातील पदवीधर मतदारांशी संपर्क साधून काँग्रेस व महाविकास आघाडीची भूमिका त्यांच्यापर्यंत पोहोचवावी. संघटित प्रयत्नांतून वंजारी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध : अभिजित वंजारी**

काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी पदवीधरांच्या प्रश्नांना विधान परिषदेत प्रभावीपणे वाचा फोडण्याचा निर्धार व्यक्त केला. सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, बेरोजगारीचा प्रश्न सोडविणे तसेच शिक्षक, कर्मचारी आणि पदवीधरांच्या विविध समस्यांचा पाठपुरावा करणे यांना प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीधर मतदारांनी दिलेल्या विश्वासाला न्याय देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असेही त्यांनी नमूद केले. या निवडणुकीत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करून विजय मिळवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे यांच्यासह उपस्थित सर्व नेत्यांनी मार्गदर्शन केले.

---

थोडक्यात

## 'एक दिवा लेकीसाठी' उपक्रमातून मुलींच्या साक्षरतेचा जागर

### प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कांद्री**

ुलींनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे, प्रत्येक मुलगी साक्षर व्हावी आणि समाजात शिक्षणाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्री माईन यांच्यावतीने 'एक दिवा लेकीसाठी' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थिनींनी मॉईल येथे दिवा प्रज्वलित करून मुलींच्या शिक्षणाचा संदेश दिला. 'मुलगी शिकली, प्रगती झाली' हा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, मुलींना शिक्षणाची समान संधी मिळावी आणि कोणतीही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. दिवा प्रज्वलित करून विद्यार्थिनींनी ज्ञानाचा प्रकाश प्रत्येक मुलीच्या जीवनात पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

मुलींचे शिक्षण हे कुटुंबाच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन आहे. मुलींना शिक्षणाची संधी मिळाल्यास त्या स्वावलंबी बनून समाजाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकतात, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्री माईन यांचा हा उपक्रम मुलींच्या शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणारा असून, समाजात स्त्रीशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला.'एक दिवा शिक्षणाचा, एक संकल्प लेकीच्या उज्ज्वल भविष्याचा!' या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे, शिक्षिका कामिनी पाटील, सुचिता नागपुरे, अनिता खंडाईत, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे उपस्थित होते.

---

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती रुजावी आणि विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी 'एकूण माझी शाळा' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध वाचनविषयक आणि भाषिक कौशल्यविकासाच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 'आवडते पुस्तक– माझा मित्र', प्रकट वाचन, वाचलेल्या पुस्तकाचा सारांश सांगणे, पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांची माहिती देणे, चित्रवर्णन, कथाकथन आणि प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आवडीची पुस्तके निवडून त्यांचे लक्षपूर्वक वाचन केले. वाचलेल्या पुस्तकातील आशय स्वतःच्या शब्दांत मांडणे, पुस्तकाचा सारांश सांगणे, मुखपृष्ठ व मलपृष्ठाचे निरीक्षण करून त्याविषयी माहिती देणे, चित्रांचे वर्णन करणे आणि गोष्टी प्रभावीपणे सांगणे अशा कृतींतून विद्यार्थ्यांनी आपल्या वाचन, आकलन आणि अभिव्यक्ती कौशल्यांचे दर्शन घडविले.

विद्यार्थी एकाग्रतेने, समजपूर्वक आणि योग्य उच्चारांसह वाचन करताना पाहून शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे आणि शिक्षक निलेश जाधव यांना विशेष आनंद झाला. विद्यार्थ्यांच्या वाचनातील प्रगती आणि त्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे सार्थक झाल्याची भावना यावेळी व्यक्त झाली. पुस्तकांशी मैत्री, नियमित वाचन आणि वाचलेल्या साहित्याचे आकलन या माध्यमांतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शब्दसंपत्ती, कल्पनाशक्ती आणि विचारक्षमता विकसित होण्यास मदत होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वाचनाचा आनंद मिळण्यासोबतच स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडण्याची संधीही मिळाली.'वाचाल तर वाचाल, वाचनातूनच घडेल उज्ज्वल भविष्य' हा संदेश देत शाळेत वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

---

## स्वर्गीय गिरजाबाई शेळके स्मृती आंतरशालेय कथाकथन स्पर्धा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** बालकला अकादमी आणि स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वर्गीय गिरजाबाई शेळके स्मृती आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली. श्रीमती दादीबाई देशमुख यांच्या मुलींच्या शाळेतील कै. सुंदरबाई साने सभागृहात झालेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत प्रभावी कथाकथन सादर केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, कल्पनाशक्ती, भाषिक कौशल्य आणि आत्मविश्वास वाढविणे हा स्पर्धेचा उद्देश होता.



**गट अ मधील विजेते :** शर्व तेलंग याने प्रथम, नमस्या सप्पटी हिने द्वितीय, तर राघव सालपेकर याने तृतीय क्रमांक मिळविला. हिमन्या लिखार हिला उत्तेजनार्थ प्रथम, तर अन्वी पिंपळकर हिला उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक मिळाले. **गट ब मधील विजेते :** संपदा तरवटकर हिने प्रथम, ज्ञानेश्वरी पिंपळकर हिने द्वितीय, तर हार्दिक इखार याने तृतीय क्रमांक पटकावला. संबोधी मेश्राम हिला उत्तेजनार्थ प्रथम, तर राघव जोशी याला उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून जिल्हा परिषद, नागपूरच्या बालक संरक्षण विभागाचे समन्वयक प्रसेंजित गायकवाड आणि पत्रकार विनोद देशमुख यांनी काम पाहिले. कार्यक्रमाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस तसेच स्वर्गीय गिरजाबाई शेळके यांच्या स्नुषा शोभा शेळके उपस्थित होत्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कथाकथन कौशल्य, कल्पकता आणि आत्मविश्वास व्यक्त करण्याची संधी मिळाली. सर्व विजेत्यांचे आयोजकांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

---

## बोगस अपंग प्रमाणपत्र बनवून देणाऱ्यांपासून अरोली व परिसरातील नागरिकांनी सावधान राहावे: प्रशांत भुरे

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

जे नागरिक अपंग आहेत व ज्यांच्याकडे अपंगत्वाचे खरे प्रमाणपत्र आहेत अशा नागरिकांना शासनाकडून यावषीर्पासून अडीच हजार रुपये मासिक अनुदान देण्यात येत आहे. मासिक अडीच हजार रुपये मिळण्याच्या लालसेपोटी तालुक्यातील काही अपंग नसणारे नागरिकही बोगस अपंग प्रमाणपत्र बोगस व्यक्तींकडून तयार करून या योजनेच्या लाभ घेण्याच्या प्रयत्न करीत आहे.





मौदा तालुक्याच्या सीमेवर स्थित भंडारा जिल्ह्याअंतर्गत येत असलेल्या कांद्री येथील जागेश्वर समरीत नामक व्यक्ती असे बोगस अपंगत्वाचे प्रमाणपत्र बनवून देत असल्याच्या व्हिडिओ सोशल मीडियावर मौदा तालुका शिवसेनाप्रमुख तथा संजय गांधी निराधार समिती सदस्य प्रशांत भुरे यांनी नुकताच त्याच्या फोटो टाकून वायरल केला.

जागेश्वर समरीत बोगस अपंगत्व प्रमाणपत्र बनवून देण्याचे नागरिकांकडून पाच हजार रुपये घेत असून, त्याने बनवून दिलेले डॉक्युमेंट्स स्कॅन होत नसून, ते प्रमाणपत्र बोगस असल्याचे सिद्ध होत आहे. तरी अरोली व परिसरातील नागरिकांनी जागेश्वर समरीत व त्यासारख्या बोगस अपंगत्व प्रमाणपत्र बनवून देणाऱ्या व्यक्तींपासून सावधान राहण्याचे आव्हान व्हिडिओच्या माध्यमातून भुरे यांनी केले आहे.

खरे अपंग लाभार्थ्यांनी खरे अपंगत्व प्रमाणपत्र बनून घेण्यासाठी भुरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आव्हानही त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केले आहे.

---

## वनसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर : कोठारी वनपरिक्षेत्रातील समिती अध्यक्षांचा ताडोबा दौरा



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे )**

मध्य चांदा वनविभागांतर्गत कोठारी वनपरिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या अध्यक्षांसाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. ताडोबाचे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक प्रभूनाथ शुक्ल यांच्या सहकार्याने आणि कोठारीचे वनपरिक्षेत्र अधिकारी रुंदन कातकर यांच्या संकल्पनेतून हा दौरा आयोजित करण्यात आले होते. वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण, जैवविविधतेचे व्यवस्थापन आणि वनांवर आधारित शाश्वत उपजीविकेच्या संधींबाबत प्रत्यक्ष माहिती मिळवून देणे हा या अभ्यास दौऱ्याचा मुख्य उद्देश होता. वनव्यवस्थापनात स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग कशा प्रकारे वाढविता येईल, तसेच वनसंपत्तीचे संवर्धन करताना पर्यावरणाचा समतोल कसा राखता येईल, याबाबत समित्यांच्या अध्यक्षांना मार्गदर्शन करण्यात आले.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा देशातील महत्त्वाच्या व्याघ्र प्रकल्पांपैकी एक असून, येथे वन्यजीव संवर्धन, वन्यप्राण्यांच्या अधिवासाचे व्यवस्थापन, वनसंरक्षण आणि स्थानिक समुदायांचा सहभाग या बाबींवर विशेष भर दिला जातो. या दौऱ्याच्या माध्यमातून समित्यांच्या अध्यक्षांना ताडोबा येथील वनव्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. वनसंवर्धनाच्या कार्यात स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग वाढविणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती करणे, वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन करणे आणि गावपातळीवर पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे, या विषयांवरही या दौ?यात भर देण्यात आला. वनांचे संरक्षण आणि संवर्धन ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून, स्थानिक ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातूनच प्रभावी वनव्यवस्थापन शक्य होते. संयुक्त वन व्यवस्थापन समित्या या वनविभाग आणि ग्रामस्थ यांच्यातील महत्त्वाचा दुवा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या अभ्यास दौऱ्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या अध्यक्षांना वन्यजीव संरक्षण आणि वनव्यवस्थापनाबाबत नवा दृष्टिकोन मिळण्यास मदत होणार आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अनुभवांचा उपयोग कोठारी वनपरिक्षेत्रातील गावांमध्ये वनसंवर्धनाचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक लोकसहभागातून वनांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

---

## चिन्मय मिशन गीता परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

चिन्मय मिशनतर्फे आयोजित गीता परीक्षेमध्ये एच.एस. महात्मे संस्कार विहार शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या परीक्षेमध्ये अशिनी खोब्रागडे हिने प्रथम क्रमांक, निहारिका डोंगरे हिने द्वितीय क्रमांक, तर अद्वैत काठोके आणि अथर्व नंदनवार यांनी अनुक्रमे तृतीय क्रमांक मिळविला. या यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.तसेच परीक्षेला सहभागी झालेल्या एकूण २७ विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तिपत्र देण्यात आले व शाळेचा सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद व मुख्याध्यापिकांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

---

# मोफत आरोग्य शिबिरात ७०० रुग्णांनी घेतला लाभ

## भिमादेवी मंदिर परिसरात महाविद्यालयाच्या उपक्रमातून १२ प्रकारच्या तपासण्या मोफत

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर महाविद्यालयाच्या स्व. भाऊसाहेब मुळक विद्यार्थी कल्याण व सामाजिक सेवा योजना आणि आय.क्यू.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने श्री भिमादेवी माता मंदिर सभागृह परिसरात गुरुवारी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ७०० रुग्णांनी विविध आरोग्य तपासण्या व मोफत औषधोपचारांचा लाभ घेतला.



हे शिबिर मेडिकल असोसिएशन, भिवापूर; भिमादेवी नवयुवक सेवा मंडळ; शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, भिवापूर; शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा तसेच येस हॉस्पिटल यांच्या संयुक्त सहकार्याने पार पडले.

सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत चाललेल्या शिबिरात रक्तदाब (बी.पी.), एचआयव्ही, त्वचा विकार, सांधे व हाडांचे आजार, अशक्तपणा, सर्दी-खोकला-दमा, स्त्रीरोग निदान, रक्तातील साखर (शुगर टेस्ट), ईसीजी, नेत्र तपासणी, अस्थिरोग आणि हृदयरोग अशा १२ प्रकारच्या आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. रुग्णांना मोफत औषधोपचारही उपलब्ध करून देण्यात आले. या आरोग्य शिबिरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण राऊत, डॉ. केवल कोरडे, डॉ. दिपाली चांदेकर, डॉ. भावना जसूदकर, डॉ. तृप्ती बोराडे, डॉ. स्नेहल सानप, डॉ. जय हरकरे यांसह तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची तपासणी करून मोलाचा वैद्यकीय सल्ला दिला. डॉ. राजेश बहुरूपी, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. सुनील शिंदे, डॉ. महावादिवार, डॉ. नंदनवार, डॉ. कडू, डॉ. चव्हाण, डॉ. वासेकर, डॉ. कुरेशी, सहाय्यक प्राध्यापक कामडी, सहाय्यक प्राध्यापक गिरडकर आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या नियोजन व व्यवस्थापनात वाणिज्य विभागातील भाग १, भाग २ व भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सक्रिय सहभाग नोंदवला. या सामाजिक उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिक व रुग्णांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

थोडक्यात

## जगदंबा नवरात्री गरबा उत्सव समितीकडून धम्म प्रवर्तना दिनाची दखल

### सर्व धर्म समभावाची शिकवण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

जगदंबा नवरात्री गरबा उत्सव समितीचे वतीने कोंढाळी नगरीत अनेक वषार्पासून गरबा उत्सव सुरु आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनी बुधवारला आयोजित कार्यक्रमात प्रथम माता दुर्गा पूजन आरती त्यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून गरबा कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी संयोजक तथा नगर पंचायत नगराध्यक्ष योगेशजी चापले, प्रमुख अतिथी माजी प्राचार्य सुधीर बुटे,उत्सव समिती अध्यक्ष अरुण खोडनकर, बांधकाम सभापती मुन्नाभाऊ शेगर, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद भाऊ चापले, बालकिसन पालिवाल,नगरसेवक आशु इरखेडे, नगरसेवक अंकित पालिवाल, सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव गिरडकर, पुरुषोत्तम हगवणे, वसंतराव बालपांडे , ज्येष्ठ पत्रकार सुरेंद्र भाजीखाये,उत्तमराव गिरडकर, पुरुषोत्तम हगवणे, गोविंदा गजभिये, प्रकाशजी बारंगे, सत्कारमूर्ती आदर्श शिक्षक प्रमोद बोडखे, योगेश टावरी, सुरेश गांधी, मासोद सरपंच रंजना बारंगे, विजय काळबांडे, गरबा प्रशिक्षक साक्षी खोडणकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी जि. प. चंदनपार्डी शाळेतील कर्तव्यदक्ष प्रमोद बोडखे शिक्षक यांना २०२६ जिल्हा आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल आयोजन समितीने त्यांचा सत्कार केला.

**गरबा आयोजनाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद**

गरबा- दांडिया आयोजनातून सर्व धर्म जात,पंथ यांना दूर ठेऊन समभावाने एकत्रित येऊन बालक, बालिका,युवती, महिला आदी उत्स्फूर्त पणे आनंद घेत होते.आरोग्य, कला आदीतून व्यक्तिमत्व घडण्यास नगरीत गरबा सुंदर व्यासपीठ ठरत आहे.सतत मोबाईल गेलेली पिढी यनिमित्याने वाईट सवयीला तिरांजली देत एकत्र येऊन अदभूत आनंद घेत आहे. याकरिता आयोजक मंडळीचे मनापासून आभर मानावयास पाहिजे. गरबा हे महिलांना मोठे व्यास पीठ मिळणारे आयोजन ठरत असल्याचे प्रतिक्रिया उपस्थिती तांनी दिल्या.

**गरबा भक्ती, शक्ती आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक मा. प्राचार्य - सुधीर बुटे**

भारतीय संस्कृतीची जपवणूक ठरणारा तसेच नवीन पिढीला आकर्षण ठरत असलेल्या गरबा उत्सव माता दुर्गा ची भक्ती, नारी शक्तीचे प्रतीक ठरत आहे. असे प्रतिपादन माजी प्राचार्य सुधीर बुटे यांनी प्रमुख अतिथी मार्गदर्शनातून व्यक्त केले.

**कोंढाळीमध्ये गरबा क्रेज**

नगरीत २००७ ला सर्वात प्रथम गाडगे सभागृह येथून गरबास प्रारंभ झाला. त्यानंतर देशमुख ले-आऊट येथील गरबाला उत्तम प्रतिसाद मिळत गेला. मागील वर्ष पासून श्री गजानन धाम तरोडा रोड विकास नगर येथील मंदिर संस्थापक जीवनभाऊ जंवजाळ नागपूर यांचे नव्याने भर घालणारे भव्य आयोजन यातून कोंढाळी नगरीतील सर्व गरबा आयोजनातून शेकडो भगिनीं, युवा गरबा उत्सवाचा आनंद घेत आहे. हे विशेष!

## पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांनी आवाज उठवावा : विवेकानंद पाटील



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

सरकार कोणत्याही पक्षाचे असो, चुकीच्या गोष्टींना चुकीचे म्हणण्याचे धाडस विद्यार्थ्यांनी दाखवावे. परीक्षांमधील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला जात असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते व विद्यार्थी आंदोलक विवेकानंद पाटील यांनी केले. नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील कथित गैरप्रकार, मतदार यादी पुनरीक्षण, मतचोरी आणि मतदान यंत्रांच्या मुद्द्यांवर गुरुवारी काटोल येथे आयोजित विद्यार्थी आंदोलनात ते बोलत होते.

विद्यार्थ्यांनी अन्यायाविरोधात आवाज उठविणे म्हणजे राजकारण नव्हे. चुकीच्या घटनांचा निषेध केला नाही, तर भविष्यात न्याय मिळविणे कठीण होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत अवांतर वाचनाची सवय लावून सामाजिक प्रश्नांची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. काटोल व नरखेड परिसरातील विद्यार्थी आणि युवक या आंदोलनात सहभागी झाले.

## विदर्भ साहित्य संघात १७ ऑक्टोबरला 'साहित्य कट्टा'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दर महिन्याला आयोजित करण्यात




येणारा 'साहित्य कट्टा' हा कार्यक्रम शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात आयोजित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध विनोदी लेखक वि. आ. बुवा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या महिन्यातील साहित्य कट्ट्यात त्यांच्या विनोदी कथांसह स्थानिक लेखकांच्या विनोदी कथांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पराग मगर, अलका मोकाशी, नीता खोत, अरुंधती वैद्य आणि स्वाती मोहरीर सहभागी होणार आहेत. रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून साहित्यिक मेजवानीचा आनंद घ्यावा, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाच हजारांत सरकारनेच दिवाळी साजरी करून दाखवावी!

## शेतकऱ्यांच्या जखमेवर घोषणांची फुंकर कशाला? खरीप उद्ध्वस्त, रब्बी संकटात; दुष्काळी मदत आणि पीकविम्याची प्रतीक्षा कायम! क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दुधाने यांचा सरकारला रोखठोक सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



नरखेड तालुक्यात यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे आणि पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. सोयाबीन, कपाशी यांसारख्या खरीप पिकांचे नुकसान झाले असून संत्रा आणि मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनाही पाणीटंचाई व फळगळतीचा फटका बसला आहे. खरीप हंगामाने शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न दिले नाही, तर दुसरीकडे पाण्याच्या अभावामुळे रब्बी हंगामाचे भवितव्यही अंधारात आहे.

अशा परिस्थितीत दिवाळी साजरी करण्यासाठी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची भेट देण्याची घोषणा करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, वाढती महागाई, शेतीचा खर्च, कर्जाचा बोजा आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न पाहता पाच हजार रुपयांत शेतकऱ्यांची दिवाळी कशी गोड होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण असला, तरी यंदा नरखेड तालुक्यातील अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत आहेत. शेतात राबूनही अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही.

बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीसाठी केलेला खर्च वसूल होण्याची शाश्वती नाही. त्यातच शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि पुढील हंगामाची तयारी या जबाबदाऱ्या शेतकऱ्यांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांच्या मदतीने शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी दूर होणार आहेत का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजनांच्या घोषणा केल्या जातात. संकटाच्या काळात आर्थिक मदतीचे आश्वासन दिले जाते; मात्र प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत असल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. त्यामुळे केवळ घोषणांवर शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार नाही, तर त्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मदतीची रक्कम जमा होणे गरजेचे आहे. लंबाडाचे आवतन जेवल्याशिवाय खरं नाही, अशी म्हण सरकारच्या घोषणांच्या अंमलबजावणीबाबत लागू पडत असल्याची टीका शेतकरी वर्गातून होत आहे.

नरखेड तालुक्यात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला आहे. सोयाबीन आणि कपाशीच्या उत्पादनात घट होण्याची भीती असून संत्रा व मोसंबी उत्पादकांनाही पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतीत मोठा खर्च करूनही हातात पुरेसे उत्पन्न येण्याची खात्री राहिलेली नाही. खरीप हंगामातील नुकसानीतून सावरण्याआधीच शेतकऱ्यांसमोर रब्बी हंगामाचे आव्हान उभे राहिले आहे. जमिनीतील ओलावा कमी झाला असून विहिरींच्या पाणीपातळीत घट होत आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसेल, तर रब्बीची पिके घ्यायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. खरीप हंगामात नुकसान आणि रब्बी हंगामात पाण्याची टंचाई, अशा दुहेरी संकटामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.

शेतकऱ्यांना दिवाळी भेट देण्याची घोषणा होत असेल, तर तिच्या अंमलबजावणी बाबत शासनाने स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई, प्रलंबित पीकविमा आणि दुष्काळी मदतीचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची गरज आहे.

संबंधित यंत्रणांनी शेतशिवारांची पाहणी करून आवश्यक पंचनामे आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी. पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्यात अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी ठोस कार्यवाही करावी.

शेतकऱ्यांच्या डोक्यावर कजार्चा बोजा असताना आणि पुढील हंगामासाठी पैशांची जुळवाजुळव करावी लागत असताना केवळ सणापुरती मदत पुरेशी ठरणार नाही. शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी वेळेत आर्थिक मदत आणि ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. पाच हजार रुपयांच्या दिवाळी भेटीची घोषणा प्रत्यक्षात कधी येणार, दुष्काळी मदत कधी मिळणार आणि पीकविम्याचा प्रश्न कधी सुटणार, याकडे आता नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**सागर दुधाने यांचा सरकारला रोखठोक सवाल!**

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दुधाने म्हणाले, शेतकऱ्यांना दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये देणार असल्याचे सांगितले जात आहे. पण आजच्या महागाईच्या काळात पाच हजार रुपयांत एका शेतकरी कुटुंबाची दिवाळी तरी कशी साजरी होणार? सरकारला वाटत असेल की पाच हजार रुपयांत दिवाळी साजरी होऊ शकते, तर सरकारनेच पाच हजार रुपयांत दिवाळी साजरी करून दाखवावी! शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव असेल, तर अशा घोषणांपेक्षा त्यांच्या खात्यात प्रत्यक्ष मदत जमा करून दाखवा.

शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी करायची, पावसाने दगा दिला की नुकसान सहन करायचे, पिके हातची गेली तरी कर्ज फेडायचे आणि मदतीसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवायचे, हीच का शेतकऱ्यांच्या विकासाची नीती? खरीप हंगामातील नुकसान झाले, रब्बी हंगाम संकटात आहे, संत्रा-मोसंबी उत्पादक अडचणीत आहेत; मग या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार नेमके काय करणार?

पाच हजार रुपयांच्या घोषणेने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. दुष्काळी मदत, पीकविमा भरपाई आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांना आश्वासनांची नव्हे, तर हक्काच्या मदतीची गरज आहे. सरकारने आधी घोषणा प्रत्यक्षात उतरवाव्यात आणि नंतरच शेतकऱ्यांच्या दिवाळीचा गाजावाजा करावा, असा घणाघाती सवाल सागर दुधाने यांनी उपस्थित केला.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर 'महावितरण'तर्फे भोजनदान, बुद्ध-आंबेडकरी साहित्य वाटप आणि ग्राहक माहिती केंद्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल मानवजातीला शांती, करुणा आणि समतेचा संदेश देणाऱ्या ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर देशभरातून येणाऱ्या लाखो अनुयायी व धम्मबांधवांच्या सेवेसाठी महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तिन्ही राज्य वीज कंपन्या सरसावल्या आहेत. सामाजिक बांधिलकीचे भान जपत तिन्ही वीज कंपन्यांतील अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांच्या 'भोजनदान व पुस्तक वितरण समिती'च्या वतीने यंदाही भोजनदान आणि विचारप्रवर्तक ग्रंथवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम बुधवार, २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजेपासून दीक्षाभूमी परिसरातील महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्र येथे आयोजित करण्यात आला आहे.

दीक्षाभूमीवर येणाऱ्या भाविकांना महावितरणचे हे उपक्रम केवळ अन्नाची तृप्तीच देणार नाहीत, तर विचारांची समृद्धीही देणार आहेत. या सोहळ्याचे उद्घाटन महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या शुभहस्ते होणार आहे. या प्रसंगी तिन्ही वीज कंपन्यांतील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. यामध्ये अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिश गजबे, गोंदिया परिमंडलाचे मुख्य अभियंता मिलिंद दिग्रसकर, महापारेषणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सतीश अणे, महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता मनिष बेडेकर, मुंबई स्थापत्य विभागाचे प्रभारी मुख्य अभियंता राकेश जनबंधू आणि सेवानिवृत्त मुख्य अभियंता सुहास रंगारी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून धम्मबांधवांना सेवा देतील.

याशिवाय, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अधीक्षक अभियंते अमित परांजपे, प्रफुल लांडे, मंगेश वैद्य, संजय वाकडे, संध्या चिवंडे, स्मिता पारखी, रमेश सानप आणि दिपाली माडेलवार हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, वीज कर्मचाऱ्यांची मोठी चमू या सेवाकार्यात सक्रिय सहभागी होणार आहे.

**दोन दिवस दीक्षाभूमीवर महावितरणचे भव्य 'माहिती केंद्र'**: केवळ सेवाभावी उपक्रमच नव्हे, तर राज्यभरातून येणाऱ्या लाखो वीज ग्राहकांना व नागरिकांना महावितरणच्या आधुनिक, ग्राहकाभिमुख सेवांची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १९ आणि २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दीक्षाभूमीवर दोन दिवसीय विशेष 'महावितरण माहिती केंद्र' उभारण्यात येत आहे. महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे आणि काँग्रेसनगर विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली हे माहिती केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहे.

या माहिती केंद्राच्या माध्यमातून सौर ऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या आणि महावितरणच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार केला जाणार आहे.

## ज्ञानदायीनी आदिशक्ती माँ शारदा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक येथे ग्रामीण भागातील शेतीमातीच्या सेवेत गुंतलेल्या शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब, सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलामुलींना शिक्षण देण्याचं पवित्र कार्य करणाऱ्या राष्ट्रीय आदर्श प्राथमिक विभाग आणि राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षिका. कोवळ्या वयातील मुलामुलीपासून तर तरुण तरुणींना शिक्षण, ज्ञान, अभ्यासाने समृद्ध करण्याचा वारसा जोपसण्याचं कार्य अविरतपणे करणाऱ्या शिक्षिका. अंधाऱ्या घरात ज्ञानाचे दिवे लावून ते सतत प्रज्वलीत कसे राहील यासाठी सतत कार्यरत राहणाऱ्या. अभ्यास आणि ज्ञान ह्या अमोघ शक्ती आहेत. त्यातूनच मानवी जीवनाचे कल्याण आहे हे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणाऱ्या ज्ञानमूर्ती.

शिक्षण आणि ज्ञानाचा वसा व वारसा आयुष्य कल्याणच्या मार्गांवर नेते. संपूर्ण जीवन प्रकाशाने उजळून टाकते याची महती या शिक्षिका शिक्षिका शिकवायला लागल्यावर कळायला लागते. ज्यांच्या घरात वर्षानुवर्षे शिक्षणाचा प्रकाश पडला नाही त्यांच्या आयुष्यात शिक्षणाची गंगा वहावी यासाठी या शिक्षिका अविरत प्रयत्न करीत आहेत. भविष्यात राष्ट्राच्या विकासात दाखल होणाऱ्या पिढ्या आणि त्यांच्या भविष्यासाठी कार्यरत आदिशक्ती. त्यांचे हे कार्य अव्याहतपणे सुरु आहे.

# सोयाबीन, कपाशीसह संत्रा-मोसंबीच्या बागाही संकटात! अनिल देशमुख यांची बांधावर जाऊन पाहणी, हेक्टरी एक लाखांच्या मदतीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त नरखेड**



काटोल आणि नरखेड तालुक्यांत यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांसह संत्रा आणि मोसंबीच्या बागांनाही मोठा फटका बसला आहे. आधीच सोयाबीन आणि कपाशीच्या उत्पादनाबाबत चिंता व्यक्त केली जात असताना आता पाण्याअभावी संत्रा-मोसंबीच्या बागांमधील फळगळ वाढली असून, अनेक ठिकाणी झाडे सुकण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांवर ओढवलेल्या या संकटाची दाहकता जाणून घेण्यासाठी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काटोल आणि नरखेड तालुक्यांतील विविध गावांमध्ये शेतांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक नियोजन कोलमडले आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी झाला असून, भूगर्भातील पाण्याची पातळीही मोठ्या प्रमाणात खालावली आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी घटल्याने सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर उभ्या पिकांसह वर्षानुवर्षे मेहनतीने जोपासलेल्या फळबागा वाचविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

काटोल आणि नरखेड तालुका संत्रा-मोसंबीच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. मात्र, यंदा पावसाच्या तुटीचा आणि पाणीटंचाईचा या फळबागांना मोठा फटका बसत आहे. पाण्याअभावी झाडांना पुरेसा ओलावा मिळत नसल्याने फळांची मोठ्या प्रमाणावर गळ होत आहे. कडक उन्हामुळे झाडांवर ताण निर्माण झाला असून, अनेक बागांमधील झाडे सुकण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

फळबागांसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे मेहनत घेतली असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक केली आहे. खते, औषधे, मजुरी आणि सिंचनावर खर्च करूनही यंदा पाणी उपलब्ध नसल्यामुळे बागा वाचविणे कठीण झाले आहे. फळगळ आणि झाडांच्या नुकसानीमुळे अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाली असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची चिन्हे आहेत. पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा अनिल देशमुख यांच्यासमोर मांडल्या. पाणीच उपलब्ध नसल्याने संत्रा-मोसंबीच्या बागांना पाणी कसे द्यायचे आणि डोळ्यांदेखत सुकत असलेल्या बागा कशा वाचवायच्या, असा उद्विग्न सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

फळबागांसोबतच परिसरातील कपाशीच्या पिकाचीही अनिल देशमुख यांनी पाहणी केली. पावसाच्या तुटीमुळे अनेक ठिकाणी कपाशीच्या झाडांची अपेक्षित वाढ झालेली नाही. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने झाडांची वाढ खुंटली असून, काही ठिकाणी बोंडधारणेवरही परिणाम झाला आहे. त्यामुळे यंदा कपाशीचे उत्पादन घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोयाबीन उत्पादक शेतकरीही पावसाच्या खंडामुळे अडचणीत आले आहेत. एकीकडे खरीप पिकांच्या उत्पादनाची अनिश्चितता, तर दुसरीकडे संत्रा-मोसंबीच्या बागांमधील फळगळ यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी केलेला खर्चही वसूल होईल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत अनिल देशमुख यांनी राज्य सरकारच्या मदतीच्या भूमिकेवर टीका केली. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना केवळ पाच हजार रुपयांची मदत जाहीर करून त्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत. इतक्या मोठ्या नुकसानीच्या तुलनेत ही मदत अपुरी असल्याचा आरोप त्यांनी केला. काटोल आणि नरखेड तालुक्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी एक लाख रुपये, कमाल तीन हेक्टरपर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली. याशिवाय संत्रा-मोसंबीच्या बागा वाचविण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी अनुदान देण्याबाबतही सरकार आणि प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, असे ते म्हणाले. पाणीटंचाईमुळे फळबागांचे होणारे नुकसान रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. केवळ पंचनामे करून किंवा अल्प आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांच्या समस्या सुटणार नाहीत. प्रत्यक्ष नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

काटोल आणि नरखेड तालुक्यांतील शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण, नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे, फळबागांसाठी पाण्याची पर्यायी व्यवस्था आणि तातडीच्या आर्थिक मदतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाने वेळ न दवडता मदतीचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. या पाहणी दौऱ्यादरम्यान अनिल देशमुख यांच्यासोबत स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## बाबासाहेबांच्या अस्थिकलशाला वंदन, दीक्षाभूमीवर धम्मभावनेचा जागर

### भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते ध्वजारोहण, संविधान चौक, विमानतळ आणि इंदोरा येथे डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ऐतिहासिक धम्मदीक्षेच्या स्मृतींना उजाळा देत दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशाला वंदन करण्यात आले. तथागत गौतम बुद्ध आणि बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन, बुद्धवंदना आणि ध्वजारोहणाने परिसर धम्ममय झाला. दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यांच्या उपस्थितीत लाखो अनुयायांनी बौद्ध धम्म स्वीकारला आणि सामाजिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीतर्पेष्ठ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दीक्षाभूमी येथे भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करून जयघोष करण्यात आला. बाबासाहेबांच्या अस्थिकलशाला वंदन केल्यानंतर उपस्थितांनी बुद्धवंदना केली. यावेळी दीक्षाभूमी परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.

**इंदोरा येथे डॉ. आंबेडकरांना अभिवादन**

यानंतर भदंत ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान चौक आणि विमानतळ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून जयभीमच्या घोषणा देण्यात आल्या. तत्पूर्वी इंदोरा बुद्ध विहार आणि इंदोरा चौकातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या प्रसंगी भंते नागसेन, भंते महानाग, भंते प्रज्ञाबोधी, भंते संघ, भंते शीलवंश, भंते नागानंद, भंते कश्यप, भंते धम्मप्रकाश, भंते धम्मदीप,भंते बुध्ददीप, भिक्खुनी संघमित्रा, संघप्रिया, विशाखा, सुजाता अंबादे यांच्यासह धम्मसेनेचे नन्हा सवाईतुल, धीरज बोरकर, अशोक गोवर्धन, समय शेंडे, अयान सवाईथुल, अमन मेश्राम, कुणाल रामटेके, मितांश सवाईथु, ओमकार अंबाडे, विनीत घरडे, अमन धनवटे तसेच मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते.

## साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक जेरी पिंटो यांच्याशी १७ ऑक्टोबरला संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ लिटररी फाऊंडेशन (व्हीएलएफ) यांच्या वतीने प्रसिद्ध लेखक जेरी पिंटो यांच्याशी 'इन कन्व्हर्सेशन विथ ऑथर जेरी पिंटो' या विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता उत्तर अंबाझरी मार्गावरील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स येथे करण्यात आले आहे.



जेरी पिंटो हे समकालीन भारतीय साहित्यातील नामवंत लेखक, कवी, अनुवादक आणि पत्रकार आहेत. २०१२ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'एम अँड द बिग हूम' या पहिल्याच कादंबरीने साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले. मानसिक आजाराशी झुंजणाऱ्या एका कुटुंबातील गुंतागुंतीचे भावविश्व मांडणाऱ्या या साहित्यकृतीला प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विंडहॅम-कॅम्पबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांचे 'हेलन : द लाइफ अँड टाइम्स ऑफ अॅन एच-बॉम्ब' (Helen: The Life and Times of an H-Bomb) हे पुस्तकही विशेष गाजले असून त्याला चित्रपटविषयक सर्वोत्कृष्ट पुस्तकासाठीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने वाचकांना त्यांच्या 'अ गुड लाइफ : द पॉवर ऑफ पॅलिएटिव्ह केअर' (A Good Life: The Power of Palliative Care) या पुस्तकाची स्वाक्षरीयुक्त प्रत मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या पुस्तकात पॅलिएटिव्ह केअर अर्थात उपशामक उपचारपद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. वाचनप्रेमी आणि साहित्याची आवड असणाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## गायत्री मंदिरात जस गायन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त रामटेक येथील गायत्री मंदिरात २११ घटांची स्थापना करण्यात आली. त्या निमित्त गायत्री परिवार ट्रस्टच्यावतीने जस गायन आयोजित केला. कार्यक्रमात भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. अनिल साहणी, वंदना रेवकर, मीना सुनवानी आणि निर्मला सुनवानी यांनी जस गायन केले. भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाला भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी गायत्री परिवाराचे सदस्य, ट्रस्टचे पदाधिकारी आणि अन्य भक्त उपस्थित होते.

# पदवीधर निवडणुकीत मतदार भाजपच्या पाठीशी उभे राहतील

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास, पश्चिम, दक्षिण-पश्चिम, उत्तर नागपुरातील मेळाव्यात साधला संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



पदवीधर मतदारसंघातील मतदारांनी सातत्याने भाजपवर विश्वास दाखवला आहे. एका निवडणुकीतील पराभवाने हा विश्वास कमी होत नाही. यंदाच्या निवडणुकीत भाजप महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्यासोबत पदवीधर मतदार ठामपणे उभे राहतील, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

पश्चिम, दक्षिण-पश्चिम, उत्तर नागपुरातील मेळाव्यात नितीन गडकरी यांनी संवाद साधला. पश्चिम नागपुरात जवाहर विद्यार्थी गृह, दक्षिण पश्चिम येथे सुरेंद्र नगरमधील नासा मैदानावर तर उत्तर नागपुरातील टेका येथील प्रल्हाद लॉन येथे मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी खासदार मायाताई इवानते, भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार संजय भेंडे, माजी आमदार संदीप जोशी, माजी आमदार नाना श्यामकुळे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, मनपा स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, गिरीश देशमुख, श्रीकांत आगलावे, विष्णू चांगदे, प्रभाकरराव येवले, वीरेंद्र कुकरेजा आदींची उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, आपल्यासाठी ही प्रतिष्ठेची निवडणूक आहे. सुशिक्षित मतदारांचा कौल आपल्या पक्षाच्या बाजूने कायम रहावा, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी आपण केलेल्या कामाची माहिती योग्य प्रकारे मतदारांपर्यंत पोहोचवावी लागेल. कामांच्या जोरावरच मते मागायची आहेत.

यावेळी गडकरी यांनी आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा दिला. सिंचनाच्या अनुशेषाचा मुद्दा विदर्भातील आमदारांनी विधानपरिषदेत लावून धरला. त्यानंतर मोठा निधी विदर्भाला मिळाला. विधानपरिषदेत पदवीधरां सोबतच, सिंचन, रोजगार आदी विषयांवर प्रश्न मांडणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

# शारदोत्सवात महिलांच्या हातांवर रंगणार मेहंदीचे रंग!

### २४ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान 'जागर शारदेचा, रंग मेहंदीचा' उपक्रम, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचा स्तुत्य उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कला, साहित्य, संस्कृती आणि भारतीय परंपरांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'जागर शारदेचा, रंग मेहंदीचा' या उपक्रमाचे यंदा सहावे वर्ष आहे. शारदोत्सवाच्या उत्सवी वातावरणात महिलांच्या हातांवर मेहंदीचे सुंदर रंग खुलवणाऱ्या या उपक्रमाला दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, गतवर्षी १ लाख १०हजारहून अधिक महिलांनी यात सहभाग नोंदविला होता.

नागपूर शहरातील सहाही विधानसभा क्षेत्रांमधील विविध शारदोत्सव मंडळांच्या ठिकाणी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या महिलांच्या हातांवर या उपक्रमांतर्गत मेहंदी रेखाटण्यात येते. श्रद्धा, सौंदर्य आणि सांस्कृतिक परंपरेचा सुरेख संगम साधणारा हा उपक्रम यंदा २४ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून शारदोत्सवाचा आनंद द्विगुणित होणार असून, महिलांना आपल्या हातांवर मेहंदीच्या आकर्षक नक्षी रेखाटून घेण्याची संधी मिळणार आहे.



या उपक्रमात शहरातील शारदोत्सव मंडळे, विविध सोसायट्या आणि मंदिरांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा महिला मोर्चा आघाडीच्या अध्यक्ष दिव्या धुरडे, मनिषा काशिकर, स्वाती आखतकर, शिल्पा पोहोणे, ज्योती देवघरे, प्रीती राजदेरकर आणि सपना सांगुले; श्रद्धा पाठक, मीता मेंडजोगे, सविता उमाठे, ऋतुजा आमले आणि कविता इंगळे; मोहिनी रामटेके, सरिता माने, सुषमा चौधरी, निरंजना पाटील आणि सपना तलरेजा, संगीता गिऱ्हे, अर्चना पाठक, कल्पना पाझारे, विशाखा जोशी, सुजाता खंबाटा आणि प्रगती पाटील; वंदना शर्मा, सपना रोडी, पल्लवी शामकुळे, वर्षा ठाकरे आणि मीनाक्षी तेलगोटे; तर मनीषा अतकरे, निशा भोयर, मधूर भांडारकर, नंदा येवले, मनीषा कोठे, मनीषा धावडे आणि वैशाली रोहनकर यांचा समावेश आहे.

# जिल्हा परिषद डवकी शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा!

### निबंध स्पर्धा, पुस्तक वाचन आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांतून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड जागृत

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

भारताचे मिसाईल मॅन आणि भारतरत्न, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ९५ व्या जयंतीनिमित्त गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय आदर्श वरिष्ठ प्राथमिक शाळा, डवकी येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय विकसित व्हावी आणि ज्ञानार्जनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर आणि प्रेरणादायी विचारांवर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यासोबतच शाळेच्या वाचनालयातील विविध पुस्तके विद्यार्थ्यांना एक तास वाचण्यासाठी देण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व, ज्ञानार्जन आणि नियमित वाचनाची सवय यांविषयी जागरूक करण्यात आले.

**वाचन हे ज्ञानसंग्रहाचे प्रभावी साधन : सुरेश कश्यप**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उच्चश्रेणी मुख्याध्यापक सुरेश कश्यप होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी, ज्ञानसंग्रह करण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे वाचन होय, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी नियमितपणे पुस्तके वाचावीत, महापुरुषांच्या जीवनचरित्रांचा अभ्यास करावा आणि आपल्या ज्ञानात सातत्याने भर घालावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती सादर केली. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर, शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणावर तसेच देशाच्या विकासातील योगदानावर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला.

**शिक्षकांनीही व्यक्त केले वाचनाचे महत्त्व**

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विषय शिक्षक रमेश पटले, तसेच घनश्याम देसाई, तपेस काशिवार, दीक्षांत धारगावे, प्रगती निखाडे मॅडम आणि सोरले मॅडम यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते.

यावेळी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचनाची सवय अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी श्रेय खरोले हिने केले, तर समृद्धी बावने हिने आभार प्रदर्शन केले.

**वाचनातूनच उज्ज्वल भविष्याची पायाभरणी!**

वाचन प्रेरणा दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तके ही केवळ ज्ञानाचा खजिना नसून यश, व्यक्तिमत्त्व विकास आणि उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारे प्रभावी माध्यम असल्याचा संदेश देण्यात आला. डवकी शाळेत आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची आवड निर्माण होण्यास तसेच ज्ञानार्जनाची प्रेरणा मिळण्यास मदत झाली.

## लॉयन्स क्लब नागपूर सेवन स्टारद्वारा नंदनवन वाचनालयात राष्ट्रीय वाचन प्रेरणा व जागतिक विद्यार्थी दिवस



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आजच्या विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचा अवलंब करीत, स्वव्यक्तिमत्व विकास साधावा, असे भावोद्गार लॉयन्स इंटरनॅशनलचे सहसचिव लॉ. डॉ. प्रमोद रक्षमवार यांनी नंदनवन वाचनालयामध्ये जागतिक विद्यार्थी दिन/राष्ट्रीयवाचन प्रेरणा दिवस/७०वा धम्मचक्र परिवर्तन दिवस/मानवता दिवस" निमित्य आयोजित कार्यक्रमप्रसंगी काढलेत अध्यक्षस्थानी लॉयन्स क्लब नागपूर सेवन स्टारचे अध्यक्ष लॉ.डॉ. शांतीदास लुंगे तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ उद्योजक लॉ.दिनेश दुआ उपस्थित होते.सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अर्पण करण्यात आले. स्वीटी कुमरे, ऋतुजा पराते, धनश्री ठाकरे या अभ्यासिका विद्यार्थिनींनी याप्रसंगी आपल्या भाषणातून दिन महात्म्य सांगितले. याप्रसंगी लॉ.दिनेश दुआ यांनी ७५ महत्वपूर्ण ग्रंथ वाचनालयाला दान दिलेत.मान्यवर अतिथीं-विद्यार्थिनींचा गुलाबपुष्प व ग्रामगीता ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक/ संचालन ग्रंथपाल स्मिता उराडे यांनी तर आभारप्रदर्शन सोपान धारगावे यांनी केले. याप्रसंगी मनीषा निखाडे, लॉ. साधना रक्षमवार, लॉ.सौदामिनी लुंगे,लॉ.डॉ.सीमा दुआ,नरेश राऊत,विलास मानकर,किरण ढोबळे यांचे सह अभ्यासिका विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खासगी नोकरी करणाऱ्या तरुणांचा संघर्ष समाजासमोर येणे गरजेचे!

### कमी पगार, थकित वेतन आणि असुरक्षित भविष्यामुळे तरुण त्रस्त

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

आजच्या काळात तरुणांसमोर खासगी नोकरी मिळविण्यापासून ते ती टिकवून ठेवण्यापर्यंत अनेक आव्हाने उभी आहेत. शिक्षण पूर्ण करूनही अनेक तरुणांना कमी पगार, वाढता खर्च, कामाचा अतिरिक्त ताण, नोकरीतील असुरक्षितता आणि वेळेवर वेतन न मिळणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या तरुणांच्या जीवनसंघर्षाकडे समाजाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत विश्वनाथ मेहतरजी राणे यांनी व्यक्त केले आहे.



विश्वनाथ मेहतरजी राणे
मु.भजेपार

**शिक्षण पूर्ण, मात्र संघर्ष संपेना!**

लहानपणापासून चांगले शिक्षण घेऊन मोठी नोकरी मिळविण्याचे स्वप्न तरुण पाहतात. आई-वडिलांना सुख देणे, स्वतःचे घर उभारणे, कुटुंबाला आर्थिक आधार देणे आणि समाजात सन्मानाने जगणे, अशी त्यांची अपेक्षा असते. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बेरोजगारी, स्पर्धा आणि कमी पगाराच्या समस्यांमुळे अनेक तरुणांची स्वप्ने अपूर्ण राहतात. खासगी कंपनीत किंवा संस्थेत नोकरी मिळाली, तरी संघर्ष संपत नाही.

**कमी पगार आणि वाढत्या जबाबदाऱ्यांचे ओझे**

खासगी नोकरी करणाऱ्या अनेक तरुणांना मर्यादित पगारात घरभाडे, किराणा, वीजबिल, प्रवासखर्च, औषधोपचार आणि इतर दैनंदिन खर्च भागवावे लागतात. महिन्याच्या सुरुवातीला मिळणारा पगार काही दिवसांतच संपतो. त्यानंतर घरखर्च भागविताना अनेक अडचणी निर्माण होतात. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या गरजा बाजूला ठेवाव्या लागतात.

**पाच-सहा महिने वेतन नाही; जबाबदार कोण?**

काही खासगी आस्थापनांमध्ये कर्मचाऱ्यांना सलग पाच-सहा महिने वेतन मिळत नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे. कर्मचारी नियमित काम करतात आणि आपली जबाबदारी पार पाडतात; मात्र त्यांना वेळेवर मोबदला मिळत नसेल, तर घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि कर्जाचे हप्ते कसे भरायचे, असा प्रश्न निर्माण होतो. काम करूनही वेतनासाठी प्रतीक्षा करावी लागणे ही कर्मचाऱ्यांसाठी मोठी आर्थिक आणि मानसिक समस्या आहे.

**नोकरी आहे, पण सुरक्षिततेची हमी नाही!**

काही खासगी नोकऱ्यांमध्ये नोकरी टिकेल की नाही, पगार वेळेवर मिळेल की नाही आणि पुढील महिन्यात रोजगार राहील की नाही, याची चिंता कर्मचाऱ्यांना सतत सतावत असते. कामाचा वाढता ताण, अतिरिक्त कामाचे तास आणि सुट्ट्या न मिळणे यामुळे त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. नोकरी असूनही भविष्याबाबत अनिश्चितता कायम राहते.

**मानसिक ताणाकडे दुर्लक्ष नको!**

आर्थिक अडचणी, कामाचा ताण, नोकरीची असुरक्षितता आणि भविष्याची चिंता यांचा तरुणांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. प्रत्येकाच्या यशाचा प्रवास वेगळा असतो. कमी पगार मिळणे म्हणजे तरुण कमी कर्तृत्ववान आहेत, असा अर्थ होत नाही. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन आणि सहकार्य मिळणे आवश्यक आहे.

**तरुणांच्या प्रश्नांकडे समाजाने गांभीर्याने पाहावे**

तरुणांनी कौशल्यविकास, आर्थिक नियोजन आणि बचतीवर भर द्यावा. कुटुंबानेही त्यांच्या प्रयत्नांना समजून घेत सहकार्य करावे. त्याचबरोबर खासगी आस्थापनांनी कामाच्या स्वरूपानुसार योग्य मोबदला, वेळेवर वेतन आणि सुरक्षित कामाचे वातावरण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शासनाने रोजगारविषयक मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण आणि कामगारांच्या तक्रारींच्या निवारणासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करावी.

**तरुणांना सहानुभूती नव्हे, संधी हवी!**

आजचा तरुण केवळ पगारासाठी काम करत नाही, तर आपल्या कुटुंबाचे भविष्य घडविण्यासाठी, आई-वडिलांना आधार देण्यासाठी आणि स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करतो. त्यामुळे त्याच्या संघर्षाची दखल घेणे, त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळवून देणे आणि सुरक्षित भविष्याच्या संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. तरुणांच्या कष्टांचा सन्मान करून त्यांना पुढे जाण्यासाठी संधी देणे, हेच खऱ्या अर्थाने विकसित समाजाचे लक्षण आहे.

**— विश्वनाथ मेहतरजी राणे, मु. भजेपार, पोस्ट अंजोरा, ता. सालेकसा, जि. गोंदिया**

थोडक्यात

## 'ती'ची कथा मधून उलगडला स्त्रीच्या जिद्दीचा प्रवास



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघ आणि ग्रंथसहवास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'ती'ची कथा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी भाऊजी दप्तरी ग्रंथसहवास, चौथा मजला, सीताबर्डी, नागपूर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध रेडिओ जॉकी आर. जे. मोना, लेखिका डॉ. लीना निकम आणि गायिका यामिनी उपगडे यांचा सहभाग होता. डॉ. लीना निकम यांनी स्त्रीच्या लेखन प्रवासाचे आणि तिच्या संघर्षाचे अतिशय सुंदर चित्रण केले आहे. पुरुषाला लेखनासाठी घरातून मिळणारे अनुकूल वातावरण आणि बायकोच्या लेखनाकडे अनेकदा केला जाणारा 'टाईमपास' म्हणून दुर्लक्ष यातील फरक स्पष्ट करत त्यांनी आपल्या पहिल्या कवितेपासून ते विविध पुस्तकांच्या लेखनापर्यंतचा रंजक प्रवास मांडला आहे.

आर. जे. मोना यांनी त्यांच्या प्रवासामध्ये अनेक लहान-मोठ्या आव्हानांचा सामना करत, शाळा-महाविद्यालयातील स्पर्धा आणि आकाशवाणी-एफएम रेडिओवरील कार्यक्रमांनी त्यांना एक लोकप्रिय रेडिओ जॅकी म्हणून काही ओळख मिळवून दिली, ही सांगितले. दररोजचे वाचन, शहरांनुसार बदलणारी भाषा आणि लोकांच्या मनातील भावना समजून घेऊन, त्यांनी रेडिओवरील कार्यक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकी जपली, असे त्या म्हणाली. यामिनी उपगडे यांनी पंडित बच्छराज शाळेत शिक्षण घेत असताना शिक्षकांनी ओळखलेली संगीताची आवड आणि शिक्षणासोबतच मिळालेले मार्गदर्शन यामुळेच आज या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणे शक्य झाले असल्याचे सांगितले. रसिक प्रेक्षकांचे प्रेम आणि प्रोत्साहन हीच या प्रवासाची खरी शिदोरी असल्याच्या त्या म्हणाल्या. कार्यक्रमाची प्रस्तावना विदर्भ साहित्य संघाच्या कोषाध्यक्ष माधुरी साकूळकर यांनी केले. कार्यक्रम सूत्रसंचालन स्वाती मोहरीर यांनी केले असून आभार प्रदर्शन शुभदा फडवणीस यांनी केले.

## हजारो रसीकांनी लुटला रास गरब्याचा आनंद

### काव्या झुंबा स्टुडिओचे भव्य आयोजन, विविध रंगांच्या आणि वेशभूषेतील हजारो लोकांचा रास गरबात सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शारदीय नवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर, शहरातील अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या काव्या झुंबा स्टुडिओने बालाजी सेलिब्रेशन लॉन येथे एका भव्य रास गरब्याचे आयोजन केले होते, ज्यात शेकडो गरबाप्रेमींनी सहभाग घेतला आणि या भव्य कार्यक्रमाचा लाभ घेतला. या दोन दिवसीय भव्य कार्यक्रमात लहान मुलांपासून ते तरुण युवती, स्त्रिया आणि विविध रंगांच्या व वेशभूषेतील महिलांनी सहभाग घेतला. श्रीराम बेकरी, बांगरे ज्वेलर्स, अवनी डेंटल क्लिनिक, सपना मेकओव्हर, अपना वेअर हाऊस, ऋषी प्रसाद ट्युशन, अंबिका रेस्टॉरंट, व्हीके इव्हेंट्स, शुभम डीजे, श्रीजी जनरल स्टोर्स यासोबतच, सोशल मिडिया अपना नागपूरियन,ए.पी.ए मीडिया हाऊस, ट्रेनिंग सावनेर, जानवी आर्ट, इत्यादी संस्थांनी सहभाग घेतला.

सावनेर तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष किशोर धुंडेले, ज्येष्ठ पत्रकार दीपक कटारे, हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड, बांगरे ज्वेलर्सचे संचालक वत्सल बांगरे, श्रीराम बेकरीचे सुमित लोहना, अवनी डेंटल क्लिनिकच्या डॉ. श्वेता चव्हाण, सोशल मीडिया अपना नागपूरियन शुभम बोंडे, संजय चंदवाणी इत्यादींच्या उपस्थितीत, माता दुर्गाची भव्य आरती आणि बक्षीस वितरणाने या भव्य कार्यक्रमाची सांगता झाली. इंडीयाज टेलेंन्ट फाईट रियालीटी झी टीव्ही शो तथा कोरीयोग्राफी इंन मराठी इंडस्ट्री चे अक्षय चौधरी यांनी पर्यवेक्षकाची चोख भुमीका निभवत विजेत्यांच्यां नावाची घोषणा केली. माता दुर्गाची भव्य महाआरती हे या कार्यक्रमाचे एक विशेष आकर्षणाचे केन्द्र होते, ज्यामध्ये सर्व स्पर्धक आणि उपस्थित मान्यवरांनी हातात दिवे घेऊन सामूहिक महाआरती सादर केली, ज्यामुळे कार्यक्रमात अधिकच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे संचालन अंकर कामेश अलघरे (सोनी) यांनी केले.तर प्रास्तावीक काव्या झुंबा स्टुडिओच्या संचालिका काव्या लोहाना यांनी कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली आणि या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता मदत देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## प्रदीप रामचंद्रराव सोनकांबळे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मानवसेवा नगर येथील रहिवासी, प्रदीप रामचंद्रराव सोनकांबळे यांचे आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७१ वर्षाचे होते. शुक्रवारी अंबाझरी घाटावर अंत्ययात्रा दुपारी ३ वाजता राहत्या घरून प्लॉट नं. २३, मानवसेवा नगर येथून करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली व बराच मोठा परिवार आहे.



# मुंबई उपनगरातील दहिसर, कांदरपाडा, एकसर कोळीवाड्यांचे नवीन सीमांकन

*फडणवीस सरकारचा निर्णय, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदेर्शावरून परिपत्रक जारी, तीन महिन्यांत येणार अहवाल, पूर्वीच्या सीमांकन झालेल्या पाच कोळीवाड्यांचे नव्याने वाढीव सीमांकनही होणार*

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

मुंबईतील कोळी समाजाच्या पारंपरिक जमिनींच्या हद्दी निश्चित करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी मुंबई उपनगरातील पाच कोळीवाड्यांच्या आधी झालेल्या सीमांकनाव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्राचे सीमांकन केले जाणार असून, दहिसर गावठाण, कांदरपाडा गावठाण-दहिसर आणि कांदरपाडा गावठाण-एकसर या तीन नवीन कोळीवाड्यांचे सीमांकन केले जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदभार्तील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

खारदांडा, जुहू कोळीवाडा, जुहू मोरागाव कोळीवाडा, मढ आणि वर्सोवा या पाच कोळीवाड्यांच्या आधी झालेल्या सीमांकनाव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्राच्या हद्दीही निश्चित केल्या जाणार आहेत.

कोकण विभागाच्या भूमी अभिलेख उपसंचालकांच्या नियंत्रणाखालील यासाठी समिती नेमण्यात आली असून समितीने तीन महिन्यांच्या आत शिफारशींसह स्वयंस्पष्ट अहवाल शासनाला सादर करायचा आहे. आवश्यकतेनुसार तज्ज्ञ व्यक्ती, निवृत्त अधिकारी किंवा अन्य योग्य व्यक्तींना समितीच्या बैठकीसाठी विशेष निमंत्रित म्हणून बोलावण्याचे अधिकारही समितीच्या अध्यक्षांना देण्यात आले आहेत.

**२९ पैकी २३ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण पूर्ण**

मुंबई उपनगरातील एकूण २९ कोळीवाड्यांपैकी २३ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण यापूर्वीच पूर्ण झाले आहे. मात्र, या सर्वेक्षणादरम्यान काही क्षेत्रे सुटल्याची तसेच काही कोळीवाड्यांचा समाविष्ट राहिल्याची निवेदने लोकप्रतिनिधींकडून शासनाला प्राप्त झाली होती. यावर विचार करून सरकारने वाढीव क्षेत्राचे आणि राहिलेल्या कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई शहरातील सात प्रमुख कोळीवाड्यांच्या सीमांकनाचा प्रश्नही गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शिवडी, सायन, कुलाबा, माहीम, मांडवी-प्रिन्सेस डॉक, वरळी आणि कफ परेड या सात कोळीवाड्यांच्या सीमांकनासाठी राज्य शासनाने यापूर्वी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीला संबंधित सीमांकनाबाबत शिफारशी सादर करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

मुंबई आणि उपनगरातील कोळी बांधव हे या परिसराचे मूळ रहिवासी आहेत. त्यांच्या पारंपरिक वस्ती आणि जमिनींच्या हद्दी स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सीमांकनाच्या प्रलंबित प्रश्नांवर कार्यवाही करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. उपलब्ध नोंदी आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून ही प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. कोळी बांधवांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या जमिनींसंदर्भातील प्रश्न सोडविण्यास शासन प्राधान्य देत आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

## नोडल अधिकाऱ्यांनी समन्वयाने नियोजनपूर्वक व कालमर्यादेत जबाबदाऱ्या पार पाडण्याचे निर्देश

### नागपूर विभाग पदवीधर मतदार संघ निवडणूक तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी समन्वयाने नियोजनबद्ध व कालमर्यादेत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात कुमार आशीर्वाद यांनी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रचना इंदुरकर, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार ) इंदिरा चौधरी, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) मलिक विराणी, उपजिल्हाधिकारी गणेश मारकड, उपजिल्हाधिकारी अमोल कुंभार, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण बिडकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दौंड यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील नायब तहसीलदार व तलाठी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

निवडणूक कार्यक्रमानुसार २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. त्यादृष्टीने निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी व वाटप जबाबदारीने व वेळेत करण्यात यावे. याबाबत उद्या नियोजन भवन येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप करण्यासाठी टेबल संख्या निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करावी. यासाठी कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करावे. मतपत्रिका व मतपेटी सुस्थितीत असल्याची खात्री करावी. मतदानासाठी लागणारे विशेष पेन तसेच इतर आवश्यक साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावे. मतदार यादी अचूक असावी. मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या तात्काळ वाटप करण्यात याव्या. टपाली मतपत्रिका वितरित करण्याची प्रक्रिया जबाबदारीने पार पाडावी. टपाली मतपत्रिकांचे संकलन योग्य पद्धतीने करून प्राप्त होणाऱ्या मतपत्रिकांचा अहवाल अद्ययावत ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले दिले.

यादरम्यान वाहतूक व्यवस्थेचे नियोजन काटेकोर असावे. तसेच वाहन अधिग्रहण, व्यवस्थापन व आराखडा अचूक असावा. नागपूर जिल्ह्यातील संबंधित सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना मागणीप्रमाणे वाहने उपलब्ध करून देण्याच्या व्यवस्थेसह प्रत्येक मतदान केंद्रासाठी आवश्यक वाहने आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यात यावे. याकामी तहसीलदार व तलाठी यांना जबाबदारी देण्यात यावी असे आशीर्वाद यांनी सांगितले.

स्ट्रॉंग रूमच्या प्रलंबित कामाबाबतचे अंदाजपत्रक त्वरित सादर करून कामास तात्काळ सुरुवात करावी. निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी नियोजित आहे. त्यादृष्टीने ही कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना केल्या. निवडणुकीच्या कोणत्याही कामात कसूर न करता संबंधित यंत्रणेने अचूक व वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## वाचन प्रेरणा दिवस व नशा मुक्त अभियान कार्यक्रम संपन्न

### गणेश वाचनालय सावनेरचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

भारताचे पूर्व राष्ट्रपति, भारतरत्न ए. पी जे अब्दुल कलाम यांची जन्म जयंती निमित्त श्री गणेश शिक्षण संस्थातर्फे गणेश वाचनालय नगर परिषद परिसरमध्ये "वाचन प्रेरणा" दिवस व तालुका विधि सेवा समिति यांचे संयुक्त विद्यमान "नशा मुक्त अभियान" कार्यक्रम एड. चंद्रशेखर बरेठिया, यांचे अध्यक्षेत व प्रमुख अतिथि तसेच अध्यक्ष तालुका विधि सेवा समिति व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर एम. बी. मोहोड़, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पी.पी ठाकुर, प्रथम श्रेणी न्यायाधीश एन.वी. रणवीर, दूसरे प्रथम श्रेणी न्यायधीश एस.एस गाळे यांचे उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी न्यायाधीश एम.बी मोहड़ यानी वाचक विद्यार्थी यांना शिक्षण व वाचन याचे महत्व पटून दिले तर न्यायाधीश एन.वी.रणवीर यांनी, मार्गदर्शन करतांना प्रतिबंधित अमलीय पदार्थ यांचे सेवनाच्या व्यसनामुळे समाजावर होत असलेले वाईट परिणाम व कायद्यातिल शिक्षा व तरतुदी बाबत जनजागृति केली.

तसेच अध्यक्षीय भाषणमध्ये एड. चंद्रशेखर बरेठिया यानी मौलिक जवाबदारी बाबत मनोगत व्यक्त करतांना संविधानप्रमाणे प्राप्त मौलिक अधिकार जपुन ठेवण्याची जबाबदारी जेवढी न्यायालयाची आहे, त्यापेक्षा मोठी जवाबदारी प्रत्येकि नागरिकावर असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संस्थेचे सचिव भूपेंद्र पूरे यानी तर आभार प्रर्दशन प्रशांत जामदार यानी केले. कार्यक्रमात प्रमुख्याने तालुका वकील संघ अध्यक्ष शैलेश जैन, अँड मनोज खंगारे पूर्व नगराध्यक्ष एड लोधी, पूर्व व्यापारी संघ अध्यक्ष विनोद जैन, रघुनन्दन जामदार, एड. श्रीकांत पांडे, शंकर ढोके, राजपुते गुरुजी, विद्यार्थी वाचक संगीता धवडे, कर्मचारी वृंद नलगुंडवार, नितिन पूरे अजय अलघरे व इत्तर सामाजिक कार्यकर्ता व विद्यार्थी वाचक उपस्थित होते.

## सावनेर तालुक्यात शाळकरी मुलांची खासगी वाहनांतून धोकादायक वाहतूक!

### ऑटो आणि मारुती व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी? आरटीओ, पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी, उद्या एखादी दुर्घटना घडली तर जबाबदार कोण? लहान मुलांच्या जीवाशी खेळ थांबणार कधी? सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांचा प्रशासनाला सवाल



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यात शाळकरी मुलांची ने-आण खासगी ऑटो, मारुती व्हॅन आणि इतर खासगी वाहनांतून केली जात असल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. काही वाहनांमध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवले जात असल्याच्या तक्रारी असून, या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर बाबीकडे प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ), स्थानिक पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांनी केली आहे.

शाळेत जाणारी लहान मुले ही देशाचे भविष्य आहेत. पालक आपल्या मुलांना विश्वासाने शाळेत पाठवतात; मात्र, शाळेत जाण्या-येण्याच्या प्रवासातच त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असेल, तर ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवणे, आवश्यक सुरक्षा व्यवस्थेकडे दुर्लक्ष करणे आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणे असे प्रकार घडत असल्यास त्यावर वेळीच नियंत्रण आणणे आवश्यक आहे.

**आरटीओची परवानगी आहे का?**

सावनेर तालुक्यात विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी ऑटो, मारुती व्हॅन आणि इतर वाहनांना विद्यार्थी वाहतुकीसाठी आवश्यक परवाने आहेत का? संबंधित वाहनांची नोंदणी, फिटनेस प्रमाणपत्र, विमा, चालकाचा परवाना आणि लागू असलेल्या सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का? या सर्व बाबींची आरटीओ विभागाने प्रत्यक्ष तपासणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

केवळ वाहन उपलब्ध आहे म्हणून त्यातून विद्यार्थ्यांची वाहतूक करता येत नाही. वाहनाची निर्धारित आसनक्षमता, परवान्याचा प्रकार आणि लागू असलेल्या परिवहन नियमांनुसारच विद्यार्थ्यांची ने-आण होणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन होत असल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे.

**उद्या अपघात झाला तर जबाबदार कोण?**

एखाद्या खासगी वाहनात क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवलेले असताना अपघात झाला, तर निष्पाप मुलांच्या जीविताची जबाबदारी कोण घेणार? एखाद्या दुदैवी घटनेनंतर प्रशासनाने चौकशी करण्यापेक्षा संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी आधीच उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ वाहतुकीचा विषय नसून पालकांच्या विश्वासाचा आणि प्रशासनाच्या जबाबदारीचा विषय आहे.

मुलांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. नियमभंग होत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे संभाव्य धोक्याला आमंत्रण देण्यासारखे आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी केवळ कागदोपत्री कारवाई न करता रस्त्यावर उतरून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी.

**आरटीओ, पोलीस आणि शिक्षण विभागाने संयुक्त तपासणी करावी**

सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांनी पुढील मागण्या केल्या आहेत :

- सावनेर तालुक्यात शाळकरी मुलांची वाहतूक करणाऱ्या खासगी ऑटो, मारुती व्हॅन आणि इतर वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबवावी.
- विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी आवश्यक परवाने आणि मान्यता आहेत का, याची खातरजमा करावी.
- वाहनाच्या निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसवणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.
- चालकाचा परवाना, वाहनाची फिटनेस, विमा आणि इतर आवश्यक कागदपत्रे तपासावीत.
- शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी केलेल्या व्यवस्थेची चौकशी करावी.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून नियमित तपासणीद्वारे अशा प्रकारांना आळा घालावा.
- पालकांना सुरक्षित विद्यार्थी वाहतुकीबाबत जागरूक करावे.

**दुर्घटना घडण्याची शवाट पाहू नका..**

सावनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आरटीओ परिवहन विभाग, स्थानिक पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. शाळा सुरू असताना विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांची तपासणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, हे प्रशासनाने स्पष्ट करावे.

सामाजिक कार्यकर्ते तथा मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांचा प्रशासनाला सवाल आहे की, विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी नियम असताना त्यांची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही? नियमभंग आढळल्यास कारवाई कधी होणार?

आजच योग्य ती पावले उचलली, तर उद्या एखाद्या निष्पाप मुलावर संकट ओढवण्यापासून रोखता येऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी करावी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक ती कठोर पावले उचलावीत, अशी मागणी हितेश बनसोड यांनी केली आहे. विद्यार्थ्यांचा सुरक्षित प्रवास ही केवळ अपेक्षा नाही, तर त्यांची जबाबदारीने जपली जाणारी गरज आहे. प्रशासनाने वेळेत जागे व्हावे, हीच अपेक्षा.

थोडक्यात

## 'मिसाईल मॅन' भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना महावितरणतर्फे अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महान शास्त्रज्ञ, द्रष्टे लेखक आणि कोट्यवधी तरुणांचे प्रेरणास्थान असलेले माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणने त्यांना अत्यंत आदराने अभिवादन केले. भारताच्या तंत्रज्ञान व आर्थिक प्रगतीसाठी २० वर्षांचा दूरदर्शी कृती आराखडा देणाऱ्या आणि मिसाईल मॅन म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या डॉ. कलामांच्या प्रतिमेला महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र आदरांजली वाहली. नागपूर परिमंडलाच्या काटोल मार्गावरील 'विद्युत भवन' या प्रशासकीय मुख्यालयात हा प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी अंजली देशपांडे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकायार्चा आणि विचारांचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

या कार्यक्रमात अधीक्षक अभियंता अमित परांजपे, दिपाली माडेलवार, प्रफुल लांडे, संजय वाकडे, वैभव पातोडे, तसेच कार्यकारी अभियंता चंदन तल्लरवार, प्रिती फुले, अमित शिवलकर यांनीही डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले. तसेच उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक समीर सिंघम आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या उच्च जीवनमूल्यांचे स्मरण केले आणि त्यांच्या 'मोठी स्वप्ने बघा आणि ती सत्यात उतरवा' या ओळखीच्या संदेशाची आठवण करून दिली.

## शाळेत पुस्तके दान स्वरूपात भेट देऊन, त्यांचे वाचन घेऊन, वाचन प्रेरणा दिन साजरा

### प्रनाग हायस्कूल आजनगाव येथील स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

तारसा-माथनी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या प्रनाग हायस्कूल आजनगाव त येथे मिसाईल मॅन एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिवस" म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विज्ञान शिक्षक गुणरत्न गजभिये होते. त्यांनी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्वखर्चाने विविध विषयासंबंधी पुस्तके दान स्वरूपात भेट दिले. यात इंग्रजी, हिंदी, मराठी भाषेतील विविध पुस्तके होती. ज्यात विद्यार्थी विकास, शेती, विज्ञान, कथा, कविता, प्रेरणादायी गोष्टी इत्यादींचा पुस्तकांचा समावेश होता. अशा विविध पुस्तकाचे प्रत्यक्षात विद्यार्थ्यांसह वाचन करून वाचन प्रेरणा दिवस हा मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक राजू गेडाम यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक अवधूत खोब्रागडे व लिपिक सुनिल डोंगरे यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे उत्स्फूर्ततेने आणि मोठ्या आवडीने वाचन करून एकमेकास केलेल्या वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रम समाप्तीनंतर शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक गुणरत्न गजभिये यांच्याकडून खाऊचे वाटप करण्यात आले. अशा पद्धतीने हा नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबवण्यात आला. याचा लाभ शाळेतील उपस्थित प्रत्येकाने घेतला.

## गडदुर्ग अभ्यासक आणि संस्थांसाठी 'अमृत शिवदुर्ग भूषण पुरस्कार २०२६' घोषित

### ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून सन्मानित केलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांसह महाराष्ट्रातील गडदुर्गांचा सखोल अभ्यास करणाऱ्या, इतिहास संशोधनात मोलाचे योगदान देणाऱ्या व दुर्गसंवर्धनासाठी राबणाऱ्या एका तज्ज्ञ व्यक्तीला आणि या कायासाठी समर्पित भावनांनी कार्य करणाऱ्या एका संस्थेला 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)', पुणे यांच्यावतीने गडदुर्ग अभ्यासक आणि संबंधित संस्थांसाठी 'अमृत शिवदुर्ग भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात येणार आहे.

अमृत संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांअंतर्गत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून यासाठी दि.१६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत www.amrutdurgotsav.com या संकेतस्थळावार ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करून आपला सहभाग नोंदवावा. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी समितीद्वारे २ व ३ नोव्हेंबर या कालावधीत केली जाईल. या पुरस्कारासाठी योग्य व पात्र व्यक्ती व संस्थेची निवड पारदर्शक व शास्त्रीय पद्धतीने व्हावी यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासक आणि अनुभवी संशोधकांची समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती प्राप्त अर्जांचे व शिफारसींचे सखोल अवलोकन करून विजेत्यांची निवड करणार असल्याचे संस्थेने कळवले आहे.

गड आणि दुर्गांचा अभ्यास, जतन व संवर्धन करणाऱ्या अभ्यासकांना आणि संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार महत्त्वपूर्ण ठरणार असून यात सहभागी होण्याचे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी केले आहे.

# अनुचित घटना टाळण्यासाठी काटेकोर नियोजन करा !

## पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांचे निर्देश, धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी पोलीस यंत्रणा सज्ज

### अनुयायांच्या मदतीसाठी १८००१२३००६१ हा हेल्पलाईन क्रमांक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दीक्षाभूमी येथे आयोजित ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस व प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. या कालावधीत कोणतीही चोरी किंवा अनुचित घटना घडू नये, यासाठी काटेकोर नियोजन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी. अनुयायांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत बंदोबस्ताचे सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी दिले.

दीक्षाभूमी येथे ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याच्या आयोजनाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस उपायुक्त ए. ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त संदीप पखाले, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे तसेच विविध समित्यांचे प्रमुख उपस्थित होते.

पोलीस यंत्रणेने शास्त्रशुद्ध पद्धतीने बंदोबस्ताचे नियोजन करावे. वाहतूक व्यवस्थापनासाठी योग्य नियोजन करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात. प्रत्येक सेक्टरमध्ये पोलीस उपनिरीक्षकांची नियुक्ती करावी. उपलब्ध मनुष्यबळाचा प्रभावी वापर करून अनुयायांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पोलीस आयुक्त नांगरे पाटील यांनी दिले. धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी येणाऱ्या अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नाचा दर्जा उत्कृष्ट असावा. अन्नातून विषबाधा होण्यासारख्या घटना घडू नयेत, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी. विविध विभागांमध्ये संपर्क, समन्वय आणि संवाद कायम ठेवणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**समन्वयाने काम करण्याचे महापालिका आयुक्तांचे निर्देश**

विविध उपसमित्यांच्या प्रमुखांनी आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे आणि सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी दिले. अनुयायांच्या सोईसाठी समता सैनिक दलासह विद्यार्थ्यांचेही सहकार्य घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

**आरोग्य, विद्युत व आपत्ती व्यवस्थापनावर भर : जिल्हाधिकारी**

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कालावधीत दीक्षाभूमी परिसरातील आरोग्य सेवा, विद्युत व्यवस्था आणि हेल्पलाईन यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत ठेवावी. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) पथकांच्या व्यवस्थेचेही नियोजन करावे. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

**तक्रार निवारणासह हरविलेल्या व्यक्तींसाठी स्वतंत्र कक्ष**

सोहळ्यादरम्यान मोठ्या संख्येने अनुयायी दीक्षाभूमी परिसरात दाखल होणार असल्याने त्यांच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. तक्रार निवारण कक्षासह हरविलेल्या व्यक्ती व बालकांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहे. तसेच अनुयायांना सापडलेल्या वस्तू जमा करण्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळविण्यासाठी १८००१२३००६१ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे.

# मानेगावच्या ग्रामसेविकेसह पती एसीबीच्या जाळ्यात!

## माजी सैनिकाच्या कामासाठी पाच लाख ५० हजारांची मागणी, एक लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले

**दै. सिंहवाणी वृत्त, प्रकाश टेंभरे, सालेकसा**

ग्रामपंचायतीचा ठराव आणि ना-हरकत प्रमाणपत्राची (एनओसी) कागदपत्रे तयार करून देण्यासाठी माजी सैनिकाकडे पाच लाख ५० हजार रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून गोंदिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई केली. या प्रकरणात मानेगाव, तालुका आमगाव येथील ग्रामसेविका उषा जयकृष्ण पाटील आणि त्यांचे पती रमाकांत ग्यानीराम मोटघरे यांना एक लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईमुळे आमगाव-सालेकसा परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार हे ४८ वर्षीय सेवानिवृत्त सैनिक आहेत. माजी सैनिक म्हणून शासनाकडून पाच एकर शेती मिळावी, यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावासंदर्भात ग्रामपंचायतीचा ठराव घेणे आणि ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करून देणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित काम करून देण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य यांच्या नावाने पाच लाख ५० हजार रुपये, तसेच काम सुरू करण्यासाठी स्वतःकरिता स्वतंत्र एक लाख रुपये, अशी एकूण पाच लाख ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. यासंदर्भात तक्रारदाराने ९ ऑक्टोबर २०२६ रोजी गोंदिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

**तक्रारीची पडताळणी करून सापळा**

तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने ९ ऑक्टोबर रोजी पंचांच्या उपस्थितीत आणि व्हॉइस रेकॉर्डरच्या मदतीने पडताळणी केली. या पडताळणीदरम्यान तक्रारदाराचे काम करून देण्यासाठी सरपंच व सदस्यांच्या नावाने पाच लाख ५० हजार रुपये आणि स्वतःकरिता स्वतंत्र एक लाख रुपये मागितल्याचे कारवाई अहवालात नमूद आहे.

त्यानंतर १३ ऑक्टोबर २०२६ रोजी एसीबीच्या पथकाने सापळा रचला. तक्रारदाराला पंचांसह लाचेची रक्कम घेऊन गोंदिया येथील आरोपींच्या निवासस्थानी पाठविण्यात आले.

**पतीने स्वीकारली लाच; दोघेही ताब्यात**

एसीबीच्या अहवालानुसार, ग्रामसेविका उषा पाटील यांनी इशारा केल्यानंतर त्यांचे पती रमाकांत मोटघरे यांनी तक्रारदाराकडून एक लाख रुपये स्वीकारले. त्यानंतर दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने दोघांनाही रंगेहात पकडले. दोन्ही आरोपी पती-पत्नी असून, या प्रकरणामुळे शासकीय कामकाजातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

**गोंदिया शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

या प्रकरणी गोंदिया शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४४/२०२६ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील कलम ७ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई अहवालानुसार, दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, गुन्हा दाखल होताच अटकेची प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे नमूद आहे. या सापळा कारवाईचे नेतृत्व पोलीस निरीक्षक अरविंद राऊत यांनी केले. पोलीस उपअधीक्षक निलेश लोधी यांच्या पर्यवेक्षणाखाली पथकाने ही कारवाई केली. नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक दिंगबर प्रधान तसेच अपर पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर आणि विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

**मालमत्तेच्या चौकशीची मागणी**

विशेष : संबंधित ग्रामसेविका उषा पाटील मोटघरे या दोन वर्षांपूर्वी सालेकसा तालुक्यातील मक्काटोला-पाथरी येथे कार्यरत होत्या. त्या काळात त्यांच्या कामकाजावरून ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. सध्याच्या लाच प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत असल्याची चर्चा आहे. या आरोपांची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक असून, प्रकरणातील दोष निश्चित होणे न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून आहे.

**नागरिकांना एसीबीचे आवाहन**

शासकीय कामासाठी कोणत्याही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन विभागाने केले आहे.

## उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करा : डॉ. विपीन

### मनपा आयुक्तांनी केली नंदग्राम प्रकल्पाची पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या मौजा वाठोडा स्थित नंदग्राम (गोठा) प्रकल्पाची मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी पाहणी केली. पाहणी दौऱ्यादरम्यान अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, राजेंद्र राठोड, घन कचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.गजेंद्र महल्ले, उपअभियंता राजीव गौतम इतर अधिकारी उपस्थित होते. आयुक्तांनी यावेळी मासोळी बाजार प्रकल्पाच्या विकास कामांची देखील पाहणी केली.

यावेळी आयुक्त डॉ. विपीन यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेत अग्निशमन व्यवस्था, विद्युत सुविधा, पाणीपुरवठा, सुरक्षा तसेच प्रकल्पाचे संचालन व देखभालीसंदभार्तील उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नंदग्राम प्रकल्पातील उर्वरित ५ टक्के स्थापत्य कामे संबंधित कंत्राटदारामार्फत प्राधान्याने पूर्ण करून घेण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले. याशिवाय प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेले अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधून कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यास सांगण्यात आले. प्रकल्पातील विद्युत उपकरणे व साहित्याचे औपचारिक हस्तांतरण होईपर्यंत त्यांचे योग्य संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराने पार पाडावी, गोठ्यांच्या स्वच्छतेसाठी पिण्यायोग्य पाण्याऐवजी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करण्याची व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश दिले. आवश्यकतेनुसार एसटीपी अथवा अन्य उपलब्ध स्रोतांमधून प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध करून देण्याबाबतही कार्यवाही करावी, निराधार व बेवारस जनावरांच्या व्यवस्थापनासाठी किमान तीन गोठे राखीव ठेवून अंदाजे ७५ जनावरांची क्षमता उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक नियोजन करावे, प्रकल्पाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची व्यवहार्यता तपासून घ्यावी, अशा सुचना दिल्या.

# जीवघेण्या वाकी डोहाच्या कुंपणाकरिता मंजूर ४८ लक्ष निधीच्या कामाला सुरुवात

## आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख यांच्या प्रयत्नातून मिळाला निधी, हितज्योती आधार फाऊंडेशनने केली होती मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील प्रसिद्ध ताजुद्दीन बाबा वाकी दरगाह जवळून वाहत असलेल्या कन्हान नदिच्या डोहात बुडून दरवर्षी अनेकांचा नाहक मुत्यू होतो. सदर अप्रीय घटना टाळण्यासाठी हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुंढेले आदिंनी क्षेत्राचे आमदार लोकनेते जननायक डॉ. आशिषबाबू देशमुख यांच्याशी भेट घेऊन सदर विषयावर विस्तृत चर्चा करुण तातडीने उपाययोजना करणाकरिता लेखी नीवेदन प्रस्तुत केले होते.

सदर निवेदनावर लगेच साकारात्मक विचार करुण तहसीलदार सावनेर, उपविभागीय अधिकारी सावनेर विभाग, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग सावनेर तसेच नागपुर यांच्याशी वेळीच संपर्क साधून घटनास्थळ पंचनामा व तातडीने करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांची माहिती संकलित करण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने सावनेर तहसीलदार, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनी दोन दा घटनास्थळी भेट देऊन सदर ठीकाणी प्रथम चरणी काटेरी तारांचे कुंपन, बँरीकेटींग, धोक्याचे स्थळ, जिवघेणा डोह आदीचे फलक, सुरक्षा कँमेरे लावने व सुरक्षा रक्षक नेमुन कन्हान नदिच्या सदर डोहाकडे जाणाऱ्यांना रोखण्याकरीता कडेकोट बंदोबस्त करणे आवश्यक असल्याची माहिती क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख यांना देण्यात आली असता त्यांनी वरिल उपाययोजना करण्यासाठी लागणार्या निधीचा आराखडा तातडीने तयार करण्याच्या सुचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने पाटबंधारे प्रकल्प विभाग नागपुरद्वारे ४८ लक्ष रुपये खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुण जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर केला असता आमदार आशिषबाबू देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी वेळोवेळी संवाद साधुन कन्हान नदीच्या सदर वाकी डोहात सातत्याने होत असलेल्या जिवीतहानी थांबवीने अंत्यंत गरजेचे असल्याचे निदर्शनास आनुन देत दि. २९ मे २०२६ रोजी पार पडलेल्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सभा सन २०२६-२७ नाविन्यपूर्ण (लेखाशीर्ष) अंतर्गत सदर कार्यास मान्यता प्रदान करुण ४८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करुण त्यातील पहिला टप्पा २० लक्ष रुपये वितरित करण्यात आला त्या अनुषंगाने सदर निर्माण कार्य सुरु करण्यात आले आहे.

**आमदार आशिष देशमुख यांच्या प्रयत्नाला यश**

क्षेत्राचे आमदार जननेते डॉ. आशिषबाबू देशमुख यांना हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुंढेले यांच्या नेतृत्वाखाली २ मे २०२६ रोजी निवेदन सादर करुण सदर जिवघेणा डोह पुरण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने आमदार डॉ. आशिषबाबू यांनी वेळीच दखल घेत पाटबंधारे विभाग सावनेर यांना घटनास्थळी पोहचून वस्तुस्थितीची जाणीव करण्याच्या सुचना दिल्या असता पाटबंधारे विभागाचे उपअभियंता व त्यांच्या सहकार्यांनी त्याच दिवशी घटनास्थळी भेट दिली व आमदारांसोबतच आपल्या वरिष्ठांना ही सदर माहीती प्रदान केली असता दि. ५ मे २०२६ रोजी सावनेर तहसीलचे तहसीलदार अक्षय पोयाम, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किशोर दमहे यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सोबत घेत सदर डोहाची पाहणी व उपाययोजना करूण लगेच आराखडा तयार करुण शासन दरबारी मंजुरी करीता पाठवला.

अवघ्या एक आठवड्यात सर्व कागदोपत्री कारवाई व मात्र तीन आठवड्यात सदर प्रकल्पाला मंजुरी मिळवून देत. सदर ठिकाणी पोहण्याच्या निदात अश्या प्रकारे होत असलेल्या मुत्यूची मालीका रोखण्यासाठी टोकाचे प्रयत्न करणारा एक खरा जनतेचा सेवक म्हणून डॉ. आशिषबाबू देशमुख यांचे कौतुक होत आहे. आज जरी सदर परिसरात काटेरी कुंपण, बँरीकेटींग व इतर उपाययोजना करण्यात येत असल्या तर भविष्यात सदर जिवघेणा डोह पुर्णपणे बुझविण्याकरिता ही आमदार आशिषबाबू देशमुख पुर्ण प्रयत्न करतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

तर सामान्य जनतेच्या जीवणाशी निगडित असलेल्या प्रश्नावर फक्त चार आठवड्यात निकाली काढत निधी उपलब्ध करुण दिल्याबद्दल ज्यांचे "कामगिरी दमदार" असे बिद वाक्य असलेले क्षेत्राचे आमदार डॉ.आशिषबाबू देशमुख यांचे सोबतच सदर बातम्या आपल्या प्रसिद्ध दैनिकात प्रखरतेने प्रकाशित करणाऱ्या सर्व पत्रकार बांधवांचे हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड, व पदाधिकारी, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी सोबतच समाजसेवी मुकेश झरबडे, निखिल पोटभरे,विकेश सहारे नरेंद्र समदुरकर,आर्यन कातकडे सह हितज्योती आधार परिवारातर्फे आभार व्यक्त केल्या जात आहे.

# कात्यायनी देवी: स्त्री शक्तीच्या जागराचा संदेश

**नवरात्र विशेष**

**शशिकांत तोटे**
**दारव्हा, जि.यवतमाळ**

आज नवदुर्गेच्या नवरात्रोत्सवाचा सहावा दिवस. आजच्या दिवशी कात्यायनी देवीची उपासना केली जाते. पौराणिक कथेनुसार, महिषासुराच्या अत्याचाराचा अंत करण्यासाठी देवतांच्या शक्ती तुन आदिशक्ती प्रकट झाली. कात्यायनी देवीने महिषासुराचा वध करून दुष्ट प्रवृत्तीचा नाश केला.या कथेतून अन्याय कितीही बलवान असला तरी अन्यायविरुद्ध पूर्ण ताकदीनिशी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते. सत्याच्या मार्गावर धैर्य व संघटित होऊन शक्ती आणि युक्तीच्या बळावर त्यांचा पराभव करता येते.हा महत्त्वपूर्ण संदेश कात्यायनी देवीच्या उपासनेतून घ्यायचा आहे.

नवदुर्गच्या विविध रूपांमध्ये तिचे वेगवेगळ्या स्वरूप आढळून येते.कात्यायनी देवीने ईथे मात्र उग्ररूप धारण केलेली आहे. देवी भागवतात तिला 'रणचंडी' असे देखील म्हटले आहे. असुरांचा उच्छाद उंच पातळीवर गेला असताना महिषासुराने सगळ्या देवतांना हरवले.जेव्हा सगळ्या देवांच्या क्रोधातून संतापातून एक तेजस्वी स्त्री रूप निर्माण झाले. ऋषी कात्यायनाच्या आश्रमात ती प्रकट झाली. म्हणून तिचे नाव 'कात्यायनी' पडले. कात्यायनी देवीने महिषासुर व अन्य असूरांचा संहार केला.परंतु आजही समाजात रूप पालटून आलेले आसूर पुन्हा पुन्हा डोके वर काढत असतात.काळ बदलला,असुर बदलले आणि त्यांची वृत्ती सुद्धा बदललेली दिसते. अशावेळी कात्यायनी देवीकडून मिळणारा समाजाला संदेश हा मोलाचा ठरतो.

आज महिषासुर मेला नाही,त्यांनी फक्त रूप बदललेले आहे. कधी तो हुंडा म्हणून येतो,कधी घरगुती मारहाण म्हणून येतो,कधी ऑफिस, सार्वजनिक रस्ते, कामाचे ठिकाण. बसमधून प्रवासात वाईट नजरेतून येतो. कधी समाज माध्यमांच्या शिवागिळीतून व कळत न कळत कानांवर येणाऱ्या घाणेरड्या शिव्या,तर कधी बीभत्स दृश्यांच्या चित्रफितीतून प्रसारमाध्यमांवर कुणाला तरी ट्रोलींग करतो.स्त्रियांनी अनेक क्षेत्रात पदार्पण केले. कधी स्त्री विकासाचे पोकळ दावे करतो.स्त्री सन्मानाचा जागतिक पटलावर नोंदही होत असेल, पण खरंच स्त्री सुरक्षित आहे..? सुरक्षित म्हणजे केवळ कायद्याचे संरक्षण नव्हे,तर सामाजिक सुरक्षितता ही तेवढीच महत्त्वाची ठरते. दररोज प्रसारमाध्यमांवर येणाऱ्या बातम्यातून स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारांच्या बातम्या येतात. ज्या संस्कृतीत स्त्रीला आदराचे स्थान दिले जाते. त्याच संस्कृतीत सर्वाधिक स्त्रिया अपहरणाच्या शिकारी झाल्या आहेत.आणखी ही श्रृंखला दिवसेंदिवस अधिक घट्ट होत आहे. अशावेळी अन्याय अत्याचाराला, शोषणाला मूकपणे संमती देणे म्हणजे, आसुरी वृत्तीला पोषक वातावरणास वाट मोकळी करून दिल्यासारखे होते.तेव्हा आजच्या कात्यायनीने विविध रूपांच्या आसुरांपासून दक्ष राहिले पाहिजे.



नऊ दिवस नऊ रूपांची आराधना करतो. नऊ रंगाची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य देतो. परंतु त्याच वेळेस समाजातील अनेक दिवसांपासून अनेक रूपे बदलून नानाविध रंगाच्या आसुरांचे सावट शारीरिक, मानसिक, शाब्दिक नजरेतून, तिरस्काराने देवीरुपी स्त्रियांचे लचके तोडणाऱ्या वृत्तीवर मात्र मूग गिळून बसतो.अशा मूक संस्कृतीला वाचा फोडण्याच्या जागर होणे अपेक्षित आहे.नाच गाण्यांचे मंच उदंड झाले.आता स्त्रियांचे प्रश्नांना,अत्याचार पीडितेला न्याय देण्याचा उत्सव उभा करण्याची गरज आहे.देवी ही फोटो,प्रतिमेत नाही.ती आपल्या घरात,शेजारी, कामाच्या ठिकाणी ती तुमची आई, बहीण,बायको,मुलगी तर मैत्रिणीच्या ही रूपात असू शकते.तिला देवीचा दर्जा नको.हवा एक माणूस म्हणून सन्मान.

कात्यायनी देवीने उग्ररूप धारण करून एकटीने हातात तलवार घेऊन आसुरांचा संहार केला.ती सांगते मी अबला नाही,मी सबला आहे.देवीच्या रूपातील संदेश मानवासाठी प्रेरक ठरतात.शस्त्र आणि शास्त्रांचा उचित वेळी वापर देवतांनी केला. ती पुढे वात्सल्यमूर्ती आहे,तर कुठे संहारी वृत्तीची दिसते.अर्थात परिस्थितीला सामोरे जाण्याचे धाडस तिच्यातून मिळते.हीच तिच्याकडून मिळणारी खरी प्रेरणा आहे.कात्यायनी देवीने हातात शस्त्र घेऊन इतरांना भयमुक्त केले.परंतु आजच्या विविध रूपातील असूरांवर अंकुश व त्यांचे पतन करण्यासाठी सामूहिक पद्धतीने संघर्ष करण्याची वेळ आजच्या स्त्री रूपी कात्यायनीवर आली आहे. प्रत्येक पावलांवर कायदा साथ देईल कशावरून? करिता आज समाजभान जागवा. मुलींना कौशल्य शिकवा. आत्मरक्षणाचे धडे द्या. अन्यायाविरुद्ध सांघिक शक्ती निर्माण करा.स्त्री ही केवळ त्याग सहनशीलता आणि ममतेची मूर्तीनसून ती सामर्थ्य, निर्णय क्षमता आणि नेतृत्वाची ही प्रतीक आहे. याची जाणीव रुजवा. आज स्त्रिया शिक्षण, विज्ञान, क्रीडा, प्रशासन, राजकारण, संरक्षण, उद्योग, आरोग्य, समाजकार्य अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम कधी करीत आहे. तरीही अनेक मुलींना आज शिक्षणापासून वंचित ठेवले जाते.त्यांच्या स्वप्नावर बंधने घातली जाते. तुटपुंज्या वेतनावर परिश्रम करावे लागते. त्यांच्या निर्णय स्वातंत्र्याला घरातूनच विरोध केला जातो.

सामाजिक क्रांतीसाठी केवळ विचार पुरेसे नसतात. त्यासाठी कृतीची जोड आवश्यक असते.स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार, अंधश्रध्देला विवेकाची जोड, जातीय भेदभावांना समतेने उत्तर आणि हिंसेला कायद्याच्या मार्गाने विरोध ही आजच्या काळातील परिवर्तनाची साधने आहेत. युवावर्गाने निर्भयता म्हणजे केवळ आक्रमकता नव्हे, तर सत्याच्या बाजूने ठाम उभे राहण्याची वृत्ती आहे हे जाणायला हवे. संकटसमयी उभे राहणे,योग्य निर्णय घेऊन पाठराखण करणे आणि दुर्बलांना मदतीचा हात देणे यातच खऱ्या शक्तीचे दर्शन घडते. देवीसमोर नऊ दिवस दिवे लावणे जेवढे महत्त्वाचे, तितकेच अन्याय अत्याचाराने पीडित असलेल्या स्त्रियांच्या जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी पुढाकार घेणे महत्त्वाची ठरते.

श्रद्धा माणसाला सदविचार देते आणि सदविचार कृतीत उतरले तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडते. शक्तीचा उपयोग उपयोग दुर्बलांना दडपण्यासाठी नव्हे,तर त्यांचे रक्षण करण्यासाठी केला पाहिजे. अन्यायासमोर झुकन्याऐवजी त्याचा प्रतिकार करण्याचे धैर्य आणि समतेवर आधारित समाज घडवून आणण्याची जिद्द प्रत्येकाने बाळगली पाहिजे. नवरात्र उत्सवात देवीच्या नऊ रूपांची पूजा ही केवळ परंपरा न राहता,स्त्रीचा सन्मान,सुरक्षित कन्या सामाजिक न्याय आणि भयमुक्त समाजाचा जागर ठरला तर कात्यायनी देवीच्या उपासनेतून खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित होईल.

**मो. ९१३०८३५४५८**

## नवरात्र विशेष : सहावी कर्तृत्ववान स्त्री

## पोलीस अधिकारी – कायद्याची रक्षक, धैर्याची प्रतीक!

**सौ. माधुरी धनोकार, अकोला**

समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी पोलीस दल अहोरात्र कार्यरत असते. या पोलीस दलामध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिला पोलीस अधिकारी आज समाजासाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. नवरात्रीच्या सहाव्या दिवशी अशाच कर्तृत्ववान स्त्रीचा गौरव करणे म्हणजे तिच्या धैर्याला, कर्तव्यनिष्ठेला आणि संघर्षाला सलाम करणे होय.

एकेकाळी महिलांसाठी अनेक क्षेत्रे मर्यादित मानली जात होती. मात्र, आज महिला पोलीस अधिकारी आपल्या बुद्धिमत्तेने, धाडसाने आणि कार्यक्षमतेने या समजुती मोडून काढत आहेत. कठीण प्रशिक्षण, शारीरिक क्षमता, कायद्याचे ज्ञान, प्रसंगावधान आणि निर्णयक्षमता यांच्या जोरावर त्या पोलीस दलात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहेत. महिला





अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, बालकांचे संरक्षण, मानवी तस्करी, सायबर गुन्हे आणि इतर गंभीर गुन्ह्यांच्या तपासामध्ये महिला पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

पोलीस अधिकारी होणे म्हणजे केवळ गणवेश परिधान करणे नव्हे, तर समाजाच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणे होय. सण-उत्सव असोत, नैसर्गिक आपत्ती असोत किंवा कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने असोत, महिला पोलीस अधिकारी अनेकदा स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यापेक्षा कर्तव्याला प्राधान्य देतात. कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना समाजाचे रक्षण करण्याचे दुहेरी आव्हानही त्या समर्थपणे पेलतात.

महिला पोलीस अधिकाऱ्यांचा गणवेश हा त्यांच्या शिस्तीचा, स्वाभिमानाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान आहे. त्यांच्या हातातील कायद्याची ताकद केवळ गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी नसते, तर अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि दुर्बलांना आधार देण्यासाठीही असते. त्यांच्या कायामुळे अनेक मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची, अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि निर्भयपणे स्वप्ने पूर्ण करण्याची प्रेरणा मिळते.

आजच्या मुलींनीही शिक्षण, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि जिद्द यांच्या बळावर पोलीस दलात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहावे. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून ती समाजाची रक्षक, अन्यायाविरुद्ध लढणारी शक्ती आणि परिवर्तनाची वाहकही आहे, हे महिला पोलीस अधिकारी आपल्या कार्यातून सिद्ध करत आहेत.

नवरात्रीमध्ये आपण देवीच्या विविध रूपांची पूजा करतो. त्याचप्रमाणे समाजातील अन्यायाविरुद्ध उभी राहणारी, संकटात धैर्याने लढणारी आणि जनतेच्या रक्षणासाठी तत्पर असणारी महिला पोलीस अधिकारी ही आधुनिक काळातील शक्तीचे जिवंत प्रतीक आहे. तिच्या कर्तृत्वाचा गौरव करणे, तिच्या कायार्चा आदर करणे आणि तिच्याकडून प्रेरणा घेणे हीच नवरात्र उत्सवाची खरी शिकवण आहे.

सलाम त्या कर्तृत्ववान महिला पोलीस अधिकाऱ्यांना, ज्या स्वतःच्या धैर्याने कायद्याचा सन्मान राखतात आणि समाजात सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करतात!

## भारत-युएई संरक्षण सहकार्याला नवी दिशा!

**नागपूरच्या IDMS Vigilant कंपनीची आखाती देशांमध्ये विस्ताराची झेप; दुबईच्या अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्ससोबत विशेष भागीदारी करार, सहा आखाती देशांमध्ये संरक्षण उत्पादने व तंत्रज्ञानाच्या प्रसाराची जबाबदारी अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्सकडे; मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला बळ**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. नागपूरस्थित आयडीएमएस व्हिजिलंट डिफेन्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या कंपनीने दुबईस्थित अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्स एलएलसी या कंपनीसोबत १४ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष व्यावसायिक भागीदारी करार केला आहे. या करारानुसार अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्सला आखाती सहकार्य परिषद (जीसीसी) अंतर्गत येणाऱ्या सहा देशांमध्ये आयडीएमएस व्हिजिलंटच्या संरक्षण उत्पादनांचा, तंत्रज्ञानाचा आणि सेवांचा प्रसार करण्यासाठी विशेष वितरण भागीदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

या भागीदारीमुळे भारतीय संरक्षण तंत्रज्ञानाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळवून देण्याच्या प्रयत्नांना चालना मिळणार असून, नागपूरच्या संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रासाठीही ही महत्त्वपूर्ण घडामोड मानली जात आहे.

**सहा आखाती देशांमध्ये विशेष भागीदारी**

या कराराच्या माध्यमातून अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्सला संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, कुवेत, बहरीन आणि ओमान या सहा देशांमध्ये आयडीएमएस व्हिजिलंटच्या उत्पादनांच्या प्रचाराची व व्यावसायिक विस्ताराची विशेष जबाबदारी देण्यात आली आहे.

या प्रदेशातील संरक्षणविषयक गरजा, ग्राहकांशी समन्वय, व्यावसायिक संधींचा विकास आणि विक्रीसाठी आवश्यक सहकार्य अशा विविध बाबींमध्ये अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्स महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. करारामध्ये व्यावसायिक हितसंबंध, ग्राहक आणि भागीदारीच्या माध्यमातून विकसित झालेल्या संधींचे संरक्षण करणाऱ्या



तरतुदींचाही समावेश आहे.

**स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाला जागतिक बाजारपेठ**

या भागीदारीचा प्रमुख उद्देश भारतीय बनावटीच्या संरक्षण तंत्रज्ञानाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देणे हा आहे. आयडीएमएस समूहाच्या उत्पादनांमध्ये ड्रोन निष्प्रभ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशेष गोळ्या, चिलखती विद्युत वाहने, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कंटेनरयुक्त नेमबाजी सराव केंद्रे, मानवरहित हवाई वाहने, ड्रोनविरोधी प्रणाली, विद्युत-दृश्य आणि अवरक्त तंत्रज्ञान, विमान देखभाल-दुरुस्ती व दुरुस्तीपश्चात देखभाल सेवा, अंतर्गत सुरक्षेसाठी उपाययोजना आणि धोरणात्मक सहाय्य सेवांचा समावेश आहे. यामध्ये ड्रोन निष्प्रभ करणाऱ्या विशेष गोळ्या (डीएनबी) हे आयडीएमएस समूहाचे प्रमुख आणि पेटंट प्राप्त उत्पादन असल्याचे कंपनीने नमूद केले आहे. या सहकार्यामुळे भारताच्या मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच संयुक्त अरब अमिरातीच्या औद्योगिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रातील उद्दिष्टांशीही ही भागीदारी सुसंगत असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**भारतीय उत्पादन कौशल्य आणि आखाती देशांच्या सुरक्षेच्या गरजांमध्ये दुवा**

या कराराविषयी बोलताना अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्सच्या प्रवक्त्याने सांगितले की, आयडीएमएस समूहासोबतची ही विशेष भागीदारी भारतीय उत्पादन कौशल्य आणि आखाती देशांच्या सुरक्षाविषयक गरजा यांच्यात महत्त्वाचा दुवा ठरेल. केवळ प्रकल्पांची अंमलबजावणी करणे नव्हे, तर सुरक्षा मोहिमांना आवश्यक तंत्रज्ञान आणि सहाय्य उपलब्ध करून देणे, हे या भागीदारीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**स्वदेशी संरक्षण उपाय जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प**

आयडीएमएस व्हिजिलंट डिफेन्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि.चे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मनोज कमल एस. तायडे यांनी या भागीदारीबद्दल समाधान व्यक्त केले. भारतीय बनावटीच्या संरक्षण उपाययोजनांना जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्ससोबत भागीदारी करताना अभिमान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमाची सुरुवात धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या आखाती प्रदेशापासून होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**व्हायब्रंट गोवा डिफेन्स समिट उपक्रमातून कराराला चालना**

हा करार व्हायब्रंट गोवा डिफेन्स समिट या उपक्रमांतर्गत सुलभ करण्यात आला. या उपक्रमाशी संबंधित संरक्षण दूत म्हणून आयडीएमएस समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज कमल एस. तायडे यांनी भूमिका बजावली.

**नागपूरस्थित आयडीएमएस समूहाची संरक्षण क्षेत्रात वाटचाल**

आयडीएमएस व्हिजिलंट डिफेन्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि. ही कंपनी नागपूर येथे स्थित असून संरक्षण उत्पादन, प्रणाली एकत्रीकरण आणि तंत्रज्ञान विकास या क्षेत्रांत कार्यरत आहे. समूहाची स्थापना मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज कमल एस. तायडे आणि संचालक डॉ. निलेश आर. अग्रवाल यांनी केली आहे. दोघेही नागपूरचे रहिवासी आहेत.

या नव्या भागीदारीमुळे समूहाला आखाती देशांमध्ये आपली व्यावसायिक उपस्थिती वाढविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्सची अंमलबजावणीतील भूमिका**

अलेक्झांडर इंटरनॅशनल वर्क्स एलएलसी ही दुबईस्थित कंपनी असून ती संयुक्त अरब अमिरातीतील अल शफर समूहांतर्गत कार्यरत आहे. संरक्षण, विमान वाहतूक, पायाभूत सुविधा आणि राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रांसाठी देखभाल-दुरुस्ती, इलेक्ट्रॉनिक व कमी-दाबाच्या प्रणाली आणि धोरणात्मक सहाय्य सेवा पुरविण्याच्या उद्देशाने कंपनीची उभारणी करण्यात आली आहे.

कंपनीचे अध्यक्ष अहमद अब्दुल्ला अली अल शफर यांना ५० वर्षांहून अधिक अनुभव असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी बड फोस्टोरिया हे कंपनीच्या पुढील व्यावसायिक विस्तारासाठी नेतृत्व करत आहेत.

भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील संरक्षणविषयक सहकार्याला बळकटी देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरू शकतो. नागपूरस्थित कंपनीने आखाती देशांमध्ये विशेष व्यावसायिक भागीदारी प्रस्थापित केल्यामुळे भारतीय संरक्षण उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत संधी उपलब्ध होण्याचा मार्ग खुला झाला आहे. स्वदेशी तंत्रज्ञान, औद्योगिक सहकार्य आणि जागतिक स्तरावरील व्यावसायिक विस्तार या तीन प्रमुख बाबींवर आधारित ही भागीदारी आगामी काळात कशी प्रगती करते, याकडे संरक्षण क्षेत्राचे लक्ष राहणार आहे.

## अनिल उपाख्य बापू चनाखेकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनिल उपाख्य बापू चनाखेकर, वय ७८ यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ते राजीवनगर येथील रहिवासी होते. रिझर्व्ह बँक



ऑफ इंडिया मधून ते सेवानिवृत्त झाले होते. बापू चनाखेकर हे नागपुरातील प्रख्यात रंगकर्मी, नाट्य संघटक होते. त्याचप्रमाणे गेली अनेक वर्षे धरमपेठ येथील राजाराम वाचनालयाचे सचिव म्हणून ते जबाबदारी सांभाळत होते.

त्यांच्या कार्यकाळात त्यांनी वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी सातत्याने अखेरपर्यंत प्रयत्न केले. याशिवाय नागपुरातील नाट्य प्रेमींना आणि कलावंताना त्यांनी राजाराम वाचनालयात हक्काची जागाही मिळवून दिली होती. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी १० वाजता सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. राजीवनगर येथील त्यांच्या निवासस्थानवरून त्यांची अंत्ययात्रा निघेल.

## दुष्काळात उसाचे वाडे ठरू शकतात पशुधनाचा आधार

**औसा :** तालुक्यासह लातूर जिल्ह्यात यंदा पावसाअभावी दुष्काळाची तीव्रता वाढत चालली असून खरीप पिकांबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या शेतात उपलब्ध असलेले ऊसाचे वाडे जनावरांसाठी महत्त्वाचा हिरवा चारा ठरू शकतात. मात्र ऊसतोडणी यंत्राद्वारे झाल्यास मोठ्या प्रमाणावर वाडे शेतातच वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या चाऱ्याचा उपयोग पशुधनासाठी करून घेण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना करणे गरजेचे आहे.

दुष्काळामुळे सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाअभावी शेतातील नैसर्गिक चारा उपलब्ध होण्याचे प्रमाण घटले आहे. त्यामुळे पशुपालकांसमोर जनावरांना चारा उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा वेळी ऊसाच्या वाड्यांचा उपयोग जनावरांसाठी चारा म्हणून केल्यास पशुधनाला मोठा आधार मिळू शकतो. सध्या अनेक ठिकाणी ऊसतोडणी हार्वेस्टरच्या माध्यमातून केली जाते. हार्वेस्टरने ऊस तोडताना ऊसाचे वाडे मोठ्या प्रमाणावर शेतातच पडून राहतात किंवा त्यांचा चारा म्हणून अपेक्षित उपयोग होत नाही. याउलट मनुष्यबळाच्या माध्यमातून ऊसतोडणी केल्यास वाडे वेगळे करून त्यांचा चारा म्हणून वापर करणे शक्य होते.